रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १७ ◆ अंक २८०
www.ramprahar.com
सोमवार, २८ एप्रिल २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## सीडीएस अनिल चौहान यांनी घेतली संरक्षणमंत्र्यांची भेट

**नवी दिल्ली** : पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर राजधानी दिल्लीत सलग बैठकांचे सत्र सुरू आहे.



संरक्षण दलांचे प्रमुख (सीडीएस) लेफ्टनंट जनरल अनिल चौहान यांनी रविवारी (दि. २७) संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांची भेट घेतली. बैठक सुमारे ४० मिनिटे चालली. दरम्यान, पहलगाम हल्ल्यानंतर भारतीय लष्कराने हाय अलर्ट जारी केला असून शोधमोहिमा सुरू केल्या आहेत. अशातच सीडीएस अनिल चौहान यांनी संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांची नवी दिल्ली येथील त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली. या बैठकीत जनरल चौहान यांनी संरक्षणमंत्र्यांना विविध ऑपरेशन्सबद्दल सविस्तर माहिती दिली आणि त्यांच्या काही धोरणांवर चर्चा केली. पहलगाममधील हल्ल्यानंतर पाकिस्तानचा सामना करण्यासाठी लष्कराने घेतलेल्या महत्त्वाच्या निर्णयांचीही माहिती चौहान यांनी दिल्याचे समजते.

## अंतरंग

'गुणात्मक आरोग्यसेवेसाठी नवीन मॉडेल तयार करणार'/२
नवी मुंबईत टाकाऊपासून टिकाऊ वस्तूंची निर्मिती/६
राज्यस्तरीय शूटिंग बॉल स्पर्धेत मालेगाव संघ विजेता/८

# पनवेलमधून नवी क्रिकेटरत्ने मिळतील

## मंत्री आशिष शेलार यांचा विश्वास; आंतरराष्ट्रीय क्रिकेट प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

क्रिकेटची पंढरी म्हणून ओळख असलेल्या लॉर्ड्स मैदानावर दिलीप वेंगसरकर यांनी धावांचे तीनदा शतक झळकावले आहे आणि अशा रत्नपारखी व्यक्तिमत्वाकडून पनवेलच्या आंतरराष्ट्रीय क्रिकेट प्रशिक्षण केंद्रातून या खेळातील नवी रत्ने मिळतील, असा विश्वास राज्याचे माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी रविवारी (दि. २७) नवीन पनवेल येथे व्यक्त केला.

पनवेलचे कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर, महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या संकल्पनेतून व पाठपुराव्यातून तसेच तत्कालीन आयुक्त गणेश देशमुख, विद्यमान आयुक्त मंगेश चितळे यांच्या प्रशासकीय अनुभवातून नवीन पनवेल येथे महापालिकेच्या माध्यमातून साकारलेल्या दिलीप वेंगसरकर संचलित आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रिकेट प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन मंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते. तत्पूर्वी काश्मीरमधील पहलगाम येथे निष्पाप पर्यटकांवर झालेल्या अमानुष दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

मंत्री आशिष शेलार यांनी पुढे बोलताना सांगितले की, क्रीडा क्षेत्राच्या अनुषंगाने उभारण्यात आलेल्या या दर्जेदार प्रशिक्षण केंद्राची सुविधा एक नंबरची आहे. विमानतळ आणि



(अधिक छायाचित्र पान ८ वर..)

क्रिकेट प्रशिक्षण केंद्र यांच्यात चार किलोमीटर अंतर आहे. त्यामुळे कनेक्ट फ्लाईटच्या निमित्ताने या ठिकाणी आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू सरावासाठी येतील. हे प्रशिक्षण केंद्र उत्तम आहेच. तंत्र, एकाग्रता आणि सातत्य टिकवणे महत्त्वाचे असते आणि ते या ठिकाणी होईल. येथील वाढती सुविधा लक्षात घेऊन रोहित शर्मासुद्धा सरावाला येईल, असेही ते म्हणाले.

मी बीसीसीआय, एमसीएमध्ये काम केले आहे. एशियन क्रिकेट कौन्सिलमध्ये काम करीत आहे. त्यामुळे क्रिकेट व आपले नाते अतूट असल्याचे अधोरेखित करीत आजच्या या प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन होत



असताना ही सुविधा खेळाडू आणि क्रिकेटप्रेमींसाठी उपलब्ध झाली आहे याचा खूप आनंद होत असल्याचेही ना. शेलार यांनी नमूद केले.

प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना खासदार श्रीरंग बारणे यांनी भाषणात सांगितले की, लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून पनवेलमध्ये मोठ्या प्रमाणात विकास झाला आहे. **(पान २ वर..)**

### इथले खेळाडू भारतीय संघात दिसतील -वेंगसरकर

या वेळी भारतीय क्रिकेट संघाचे माजी कर्णधार दिलीप वेंगसरकर म्हणाले की, पनवेल कार्यक्षेत्रात क्रिकेट खेळाडूंमध्ये मोठ्या प्रमाणात टॅलेंट दिसून येते. या क्रिकेट प्रशिक्षण केंद्रामुळे त्यांना व्यासपीठ मिळेल आणि इथले खेळाडू भविष्यात भारतीय संघातून खेळताना दिसतील. सुनील गावसकर, सचिन तेंडुलकरनंतर विराट कोहली आणि पुढचा कोण तर तो पनवेलमधून असेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त करीत युवा खेळाडूंमध्ये स्फूर्ती निर्माण केली.

# पहलगाम हल्ल्यातील दोषींना कठोरातील कठोर शिक्षा देणार -पंतप्रधान मोदी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी (दि. २७) मन की बात कार्यक्रमातून देशवासीयांना संबोधित केले. या वेळी त्यांनी पहलगाम दहशतवादी हल्ल्यातील दोषींना कठोरातील कठोर शिक्षा देणार असून मृतांच्या कुटुंबियांना न्याय देणार असल्याचे सांगितले.

पंतप्रधान मोदींनी 'मन की बात'च्या १२१व्या भागात पहलगाम हल्ला आणि त्यानंतर भारताकडून उचलली जाणारी पावले याबद्दल भाष्य केले. दहशतवाद्यांना आणि त्यांच्या सूत्रधारांना काश्मीर पुन्हा उद्ध्वस्त करायचे आहे आणि म्हणूनच त्यांनी एवढा मोठा कट रचला होता, परंतु १४० कोटी भारतीयांची एकता आपली सर्वात मोठी ताकद आहे. ही एकता दहशतवादाविरुद्धच्या आपल्या निर्णायक लढाईचा आधार आहे, असे सांगून पंतप्रधान मोदी म्हणाले की, दहशतवादी हल्ल्यानंतर जगभरातून शोक व्यक्त केला जात आहे. जागतिक नेत्यांनीही मला फोन केले आहेत, पत्रे लिहिली आहेत आणि संदेश पाठवले आहेत. जग आपल्यासोबत आहे. मी पुन्हा एकदा पीडित कुटुंबांना आश्वासन देतो की त्यांना नक्कीच न्याय मिळेल. या हल्ल्यातील गुन्हेगारांना आणि कट रचणाऱ्यांना सर्वात कठोर उत्तर दिले जाईल.



### संपूर्ण देश एकजूट झालाय!

काश्मीरमध्ये शांतता परतत होती, शाळा आणि महाविद्यालयांमध्ये चैतन्य होते, विकासकामांना गती मिळाली होती, लोकशाही मजबूत होत होती, पर्यटकांच्या संख्येत विक्रमी वाढ होत होती, लोकांचे उत्पन्न वाढत होते, तरुणांसाठी नवीन संधी निर्माण होत होत्या. हे देशाच्या, जम्मू-काश्मीरच्या शत्रूंना पहावले नाही. पहलगाममधील हल्ला दहशतवादाला प्रोत्साहन देणाऱ्यांची निराशा आणि त्यांचा भ्याडपणा दर्शवितो, असे पंतप्रधान मोदी म्हणाले. देशासमोरील या आव्हानाला तोंड देण्यासाठी आपल्याला संकल्प मजबूत करावा लागेल. एक राष्ट्र म्हणून आपल्याला प्रबळ इच्छाशक्ती दाखवावी लागेल. आज जग पाहतंय या दहशतवादी हल्ल्यानंतर संपूर्ण देश एकजूट झाला आहे, असेही पंतप्रधानांनी नमूद केले.

## निवडक

### दुचाकीला धडकून व्हॅन विहिरीत कोसळली, १० जणांचा मृत्यू

**भोपाळ** : मध्य प्रदेशच्या मंदसौर जिल्ह्यातील नारायणगड येथे निघालेल्या भाविकांची व्हॅन ही चालकाचे नियंत्रण सुटल्याने दुचाकीला धडकली आणि नंतर रस्त्याच्या बाजूला असलेल्या विहिरीत कोसळली. या अपघातात दुचाकीस्वार तसेच अपघातग्रस्तांना वाचवण्यासाठी विहिरीत उतरलेल्या एकासह १० जणांचा मृत्यू झाला, तर चार जण जखमी झाले आहेत. मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे.

### गैर-मुस्लीम विद्यार्थ्यांना नमाज अदा करायला लावली, गुन्हा दाखल

**बिलासपूर** : छत्तीसगडच्या बिलासपूरमधून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. येथील एका एनसीसी कॅम्पमध्ये विद्यार्थ्यांना जबरदस्तीने नमाज अदा करण्यास भाग पाडण्यात आले. यापैकी बहुसंख्य विद्यार्थी गैर-मुस्लीम होते. गुरू घासीदास केंद्रीय विद्यापीठातील विद्यार्थ्यांबरोबर हा प्रकार घडला. पोलिसांना याबाबत माहिती मिळताच त्यांनी कारवाई करीत आठ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यापैकी सात जण शिक्षक आहेत, तर एक विद्यार्थी आहे.

# हत्या करून मृतदेह टाकला रेल्वे रूळालगत

## खालापुरातील नावंढे येथील प्रकार

**खालापूर : प्रतिनिधी**

खालापूर तालुका पोलीस ठाणे हद्दीत नावंढेनजीक रेल्वे रूळानजीक अज्ञात व्यक्तीचा खून करून मृतदेह टाकण्यात आला आहे. काही दिवसांपूर्वी कर्जत तालुक्यातही रेल्वेरूळालगत एका सुटकेसमध्ये महिलेचा मृतदेह आढळून आला होता.

खालापूर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार २६ एप्रिल रोजी दुपारी १च्या सुमारास नावंढे गावच्या हद्दीत खोपोली-कर्जत रेल्वे रूळानजीक अनोळखी व्यक्तीच्या (वय अंदाजे ४० ते ५०) डोक्यात कोणत्या तरी हत्याराने जखम करून त्याला जीवे मारले तसेच पुरावा नष्ट करण्यासाठी मृतदेहावर दगड रचून ठेवण्यात आले होते.

घटनेची माहिती मिळताच खालापूर पोलीस ठाण्याचे निरीक्षक सचिन पवार यांनी पथकासह घटनास्थळी भेट दिली. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेत शवविच्छेदनासाठी खालापूर प्राथमिक आरोग्य केंद्रात आणण्यात आला असून अधिक तपास सुरू आहे.

याआधीही रायगड जिल्ह्याच्या विविध भागात मृतदेह आढळल्याच्या घटना घडल्या आहेत. काही दिवसांपूर्वी मुंबई-पुणे महामार्गावर बोरघाटात एका तरुणाचा कुजलेला मृतदेह आढळला होता, तर मुंबई-गोवा महामार्गावरही पेण तालुक्यातील दुरशेत फाटा येथे नदीकिनारी एका सुटकेसमध्ये महिलेचा मृतदेह आढळून आल्याने खळबळ उडाली होती. अलिकडे हत्या करून मृतदेह कुठेही टाकले जात आहेत.

# ऑनर किलिंगने जळगाव हादरले!

**जळगाव : प्रतिनिधी**

ऑनर किलिंगच्या घटनेने जळगाव हादरले आहे. प्रेमविवाह केल्याच्या रागातून एका निवृत्त पीएसआय बापाने आपल्या मुलीवर भरलग्नात घुसून गोळीबार केला. या हल्ल्यात मुलीचा मृत्यू झाला असून जावई गंभीर जखमी झाला आहे. ही घटना जळगाव जिल्ह्याच्या चोपडा येथे घडली.

सीआरपीएफमधील सेवानिवृत्त पीएसआय किरण मांगले यांची मुलगी तृप्ती हिने साधारण वर्षभरापूर्वी अविनाश वाघ याच्याशी प्रेमविवाह केला होता. विवाहानंतर हे दाम्पत्य पुण्यात राहत होते. अविनाशच्या नातेवाईकांच्या लग्नासाठी दोघेही चोपडा शहरात आले होते. किरण मांगलेंनी लग्नस्थळी पोहचत तृप्ती व अविनाशवर गोळ्या झाडल्या. गोळीबारात तृप्तीचा जागीच मृत्यू झाला, तर अविनाश गंभीर जखमी झाला आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास केला जात आहे.





**पनवेल : शेतकरी कामगार पक्षाला मोठा धक्का बसला असून शेकाप ट्रान्सपोर्ट सेलचे राज्य अध्यक्ष प्रभूदास भोईर आणि उपाध्यक्ष अतुल घरत यांनी रविवारी राज्याचे माहिती तंत्रज्ञान आणि सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्या प्रमुख उपस्थितीत भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस नितीन पाटील आदी उपस्थित होते.** (सविस्तर वृत्त उद्याच्या अंकात)

# रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलचे स्नेहसंमेलन, पारितोषिक वितरण

## मान्यवरांकडून विद्यार्थ्यांचे कौतुक

**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

जनार्दन शिक्षण प्रसारक संस्थेच्या उलवे नोड येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलचे पहिले वार्षिक स्नेहसंमेलन आणि पारितोषिक वितरण मोठ्या उत्साहात झाले. हा समारंभ सांस्कृतिक रंगांनी नटलेला, प्रेरणादायी भाषणांनी भरलेला आणि शैक्षणिक व उपक्रमात्मक यशाच्या गौरवाने साजरा करण्यात आला.

रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये आयोजित या कार्यक्रमाचा प्रारंभ संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर व अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत दीप प्रज्वलनाने झाला. प्रमुख पाहुणे म्हणून आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी यांची उपस्थिती लाभली. त्याचप्रमाणे सहाय्यक पोलीस उपायुक्त विशाल नेहूल, संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, सदस्य प्रकाश भगत, हरिभाऊ पाटील, स्वप्नील ठाकूर,




अमोघ ठाकूर, शाळा समितीचे अध्यक्ष भार्गव ठाकूर आदी उपस्थित होते.

लोकनेते रामशेठ ठाकूर व एसीपी विशाल नेहूल यांनी उद्बोधक मार्गदर्शन केले. मुख्याध्यापिका चष्मिंदर बक्षी यांनी २०२४-२५ या शैक्षणिक वर्षाचा वार्षिक अहवाल सादर केला तसेच शाळेच्या प्रगती व उपक्रमांची माहिती दिली.

या कार्यक्रमातील एक महत्त्वाचा भाग म्हणजे पारितोषिक वितरण समारंभ, ज्यामध्ये शैक्षणिक, क्रीडा, कला, नेतृत्वगुण व एकंदर वर्तणूक या सर्व क्षेत्रांत उत्कृष्ट कामगिरी केलेल्या विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले. सांस्कृतिक सादरीकरणही झाले. कार्यक्रमाची थीम निसर्गाची साद-आज आणि उद्या ही होती. यात विद्यार्थ्यांनी पाणी, हवा, माती, झाडे, प्राणी यांचे संरक्षण करून पृथ्वीचे संवर्धन कसे करता येईल हे प्रभावीपणे सादर केले.

कार्यक्रमास गव्हाण ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विजय घरत, शाळा समिती सदस्य जयवंत देशमुख, विश्वनाथ कोळी, वामन म्हात्रे, सुदर्शन म्हात्रे, श्रीकांत घरत, किशोर पाटील, मीनाक्षी पाटील, राधा ठाकूर, आरटीपीएस खारघर मुख्याध्यापिका राज अलोनी, आरटीपीएस सीनियर सेकेंडरी कॉलेज खारघरच्या मुख्याध्यापिका निशा नायर, एमएनएमव्ही व टीएनजी, गव्हाण-कोपरच्या मुख्याध्यापिका प्रणिता गोळे यांच्यासह पालक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


# मुंबई इंडियन्स एक्स्प्रेस सुसाऽऽट!

## आयपीएलमध्ये सलग पाचवा विजय, लखनऊवर मात

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएलच्या यंदाच्या हंगामात पहिल्या चार सामन्यात फक्त एक विजय मिळवणाऱ्या मुंबई इंडियन्सचा संघाने धमाकेदार कमबॅक केले आहे. वानखेडेच्या मैदानात रविवारी (दि. २७) रंगलेल्या सामन्यात मुंबई संघाने लखनऊला सुपर जाएंट्सला चारीमुंड्या चीत केले. मुंबईने यंदाच्या मोसमातील सलग पाचवा विजय मिळवत गुणतालिकेत दुसऱ्या क्रमांकावर झेप घेतली आहे.

पहिल्यांदा फलंदाजी करताना रायन रिकल्टन (५८ धावा) आणि सूर्यकुमार यादव (५४ धावा) यांच्या अर्धशतकासह अन्य फलंदाजांनी केलेल्या



उपयुक्त खेळीच्या जोरावर मुंबई इंडियन्सच्या संघाने निर्धारित २० षटकात ७ बाद २१५ धावा केल्या होत्या. या धावसंख्येचा पाठलाग करताना लखनऊचा संघ १६१ धावांत आटोपला. गोलंदाजीत जसप्रीत बुमराह, ट्रेंट बोल्ट आणि विल जॅक्ससह कॉर्बिन बॉशच्या भेदक माऱ्यासमोर लखनऊचे फलंदाज हतबल ठरले.

मुंबईने दिलेल्या २१६ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना लखनऊची सुरुवात फारशी चांगली झाली नाही. मिचेल मार्श आणि एडन मारक्रम यांनी फटकेबाजी केली खरी, पण तिसऱ्या षटकात बुमराहने संघाला पहिला ब्रेकथ्रू मिळवून दिला. निकोलस पुरन आणि मार्शने पॉवरप्लेमध्ये संघाला ६० धावांचा टप्पा गाठून दिला. पण विल जॅक्सने पुरन आणि पंतला एका षटकात बाद करीत सामना मुंबईच्या बाजूने फिरवला. आयुष बदोनीने संघाचा डाव सावरला, मात्र मुंबईच्या गोलंदाजांनी फलंदाजांना सामन्यात परतण्याची फारशी संधी दिली नाही.

# गुणात्मक आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी नवीन मॉडेल तयार करणार -मुख्यमंत्री फडणवीस

**छत्रपती संभाजीनगर : प्रतिनिधी**

सार्वजनिक आरोग्य विभाग आणि वैद्यकीय शिक्षण विभागाच्या समन्वयातून आरोग्य सेवेतील त्रिस्तरीय यंत्रणा पुढील तीन ते चार वर्षात उभी करण्यात येणार आहे. या माध्यमातून प्रत्येक व्यक्तीला गुणात्मक आरोग्य सेवा त्याच्या घरापासून तीन ते पाच किलोमीटर परिसरात उपलब्ध करून देण्यासाठी नवीन मॉडेल तयार करण्यात येणार असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.



दरम्यान, देशात मोठ्या प्रमाणावर उपचार सुविधा निर्मितीवर भर देण्यात येत असून चालू वर्षात कर्करोगावर अधिक लक्ष केंद्रीत केले आहे. ज्यामुळे लवकर निदान करण्यासोबतच निदान झाल्यावर ९० टक्के रुग्णांवर ३० दिवसात उपचार सुरू करण्यात आले आहेत. याची नोंद जागतिक स्तरावर घेण्यात आली असल्याचे केंद्रीय आरोग्य मंत्री जे.पी.नड्डा यांनी सांगितले.

शासकीय कर्करोग रुग्णालयातील ट्रू बीम युनिट या कर्करोगावरील अतिविशेष उपचार देणाऱ्या अत्याधुनिक यंत्र प्रणालीचे व कर्करोग संस्थेच्या विस्तारीत भागाचे लोकार्पण आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली तसेच केंद्रीय आरोग्य, कुटुंब कल्याण व रसायने आणि खते मंत्री जे.पी. नड्डा यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, इमाव कल्याण मंत्री अतुल सावे, विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, राज्यसभा सदस्य खासदार डॉ. भागवत कराड, खासदार सांदिपान भुमरे, आमदार सतिश चव्हाण, आमदार संजय केणेकर, आमदार नारायण कुचे, आमदार अनुराधा चव्हाण, आमदार संजना जाधव, वैद्यकीय शिक्षण विभागाचे सचिव धीरज कुमार, वैद्यकीय शिक्षण आयुक्त राजीव निवतकर, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे, राज्य कर्करोग संस्थेचे सल्लागार डॉ.कैलास शर्मा, राज्य कर्करोग रुग्णालयाचे विशेष कार्य अधिकारी डॉ. अरविंद गायकवाड, संचालक डॉ. अजय चंदनवाले तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, छत्रपती संभाजीनगर येथे ट्रू बीमसारखी कर्करोगावरील उपचारासाठी अद्यावत सुविधा उपलब्ध होत आहे, याचे समाधान आहे. राज्यात शासकीय आरोग्य व्यवस्थेत छत्रपती संभाजीनगर येथे पहिल्यांदा ही अद्ययावत उपचार यंत्रणा उपलब्ध होत आहे. जीवन पद्धतीत झालेल्या बदलांमुळे कर्करोगाचे प्रमाण वाढले आहे. कर्करोगावरील उपचारासाठी रेडिएशन, कीमोथेरेपी यासारखी पद्धती वापरली जात आहे. आधुनिक तंत्रज्ञान विकसित होत आहे. ट्रू बीमसारख्या अद्यावत यंत्रामुळे ज्या भागात संक्रमण आहे, त्याच भागात नेमकेपणाने रेडिएशनद्वारे उपचार करणे शक्य झाले आहे. या उपचारासाठी राज्यात टाटा मेमोरियल हॉस्पिटल येथे जावे लागत होते, देशभरातून तिथे येणाऱ्या रुग्णांची संख्या मोठी असल्याने टाटा मेमोरियल हॉस्पिटलवर मोठा भार आहे. मात्र, आता छत्रपती संभाजीनगर येथे ही सेवा उपलब्ध झाली असून मराठवाडा तसेच लगतच्या जिल्ह्यातील कर्करोगाच्या रुग्णांसाठी ही सुविधा वरदान ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

छत्रपती संभाजीनगर येथे अद्ययावत कर्करोग सुविधा उपलब्ध होण्यासाठी केंद्र सरकारकडून सहाय्य मिळावे, यासाठी २०१६ मध्ये येथील कर्करोग रुग्णालयाला राज्य कर्करोग संस्थेचा दर्जा देण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार आवश्यक कार्यवाही करून आज अद्ययावत उपचार सुविधा उपलब्ध झाली असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, कर्करोगावरील संपूर्ण उपचार रुग्णांना मिळावेत, यासाठी पेट सिटी स्कॅनरलाही मंजूरी देण्यात आली आहे. हे उपकरण कार्यान्वित झाल्यानंतर कर्करोग रुग्णांवरील उपचारासाठी आणखी चांगली सुविधा मिळू शकेल. कर्करोग बरा होण्यासाठी लवकर निदान महत्त्वाचे असते, मात्र अनेकदा त्याकडे दुर्लक्ष केले जाते. त्यामुळे राज्य शासनाच्या सर्व वैद्यकीय सेवा देणाऱ्या संस्थांमध्ये याबाबतची तपासणी शिबिरे आयोजित करण्यात येत आहेत. यासोबतच कर्करोग होवूच नये, यासाठीही जनजागृती करण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्यात गेल्या दोन-अडीच वर्षांमध्ये जवळपास दहा नवीन वैद्यकीय महाविद्यालये सुरू केली आहेत. त्यामुळे वैद्यकीय शिक्षणाच्या जागा वाढल्या आहेत. वैद्यकीय महाविद्यालयांच्या पायाभूत सुविधांसाठी जवळपास पाच हजार कोटी रुपयांचे कर्ज उभारण्यात आले आहे. ज्यामध्ये जिल्ह्यातील सामान्य रुग्णालय हे वैद्यकीय महाविद्यालयामध्ये रुपांतरीत झाले आहेत, अशा जिल्ह्यात स्वतंत्र सामान्य रुग्णालय उभारण्याचा निर्णयही घेतला असल्याचे त्यांनी सांगितले.

## म्हसळा शहरात कारचालकाने एसटी बसचालकास लाथाबुक्क्यांनी मारले



**म्हसळा : प्रतिनिधी**

म्हसळा शहरांत अरुंद रस्त्यांमुळे स्वयंशिस्तीचे धोरण आणि पोलीस प्रशासनाला मदत म्हणून एस.टी. मंडळाच्या बसेस वन वे मार्गाने जात असतात, परंतु अन्य खाजगी वाहने दोनही बाजूने वाहतुकीचे नियम तोडून जातात

श्रीवर्धन कोलमांडला मुंबई ही बस मुंबईकडे जात असता शहरांतील तांबट आळींतील अरुंद रस्त्यावर श्रीवर्धनकडे जाणार्या व्हगनरचे चालक अ. हाजी नजीर अहमद खतीब वय ४० रा आगरदांडा यांचेकडून गाड़ी एसटीला घासली म्हणून कार चालकाने रागाने कारमधून उतरून एस.टी. चालकाच्या केबीन मध्ये घुसून ड्रायव्हर लिंबराज चोरमले वय ३५ याला लाथा-बुक्क्यानी मारहाण केली. कंडक्टर गणेश पवार ह्यानी कार चालकाला आमची चूक नाही असे सांगताच रागाने कंडक्टर गणेशलाही त्यानी मारहाण केल्यामुळे ड्रायव्हर आणि कंडक्टरने पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दिल्याने म्हसळा पोलीसानी गुन्हा नोंदविला आहे. गुन्हाचा तपास पो.स.ई.ज्ञानेश्वर एडवळे सपोनि संदीप कहाळे यांच्या मार्गदर्शना खाली करीत आहेत.

## 'जनतेची दिशाभूल करणाऱ्या अधिकाऱ्यांची गय केली जाणार नाही'

**महाड : प्रतिनिधी**

खासदार सुनिल तटकरे यांनी महाड येथे शनिवारी शासकीय अधिकारी आणि औद्योगिक क्षेत्रातील कंपन्यांच्या अधिकाऱ्यांची बैठक घेऊन कामांचा तसेच समस्यांचा आढावा घेतला. या वेळी चुकीची माहिती देऊन अनेक अधिकारी जनतेची दिशाभूल करतात आणि बैठकीत वेळ मारून नेतात, मात्र अशा बेजबाबदार आणि दिशाभूल करणाऱ्या अधिकाऱ्यांची गय केली जाणार नाही, असा इशारा खासदार सुनिल तटकरे यांनी दिला.

महाड व पोलादपूर तालुक्यातील विविध शासकीय विभागाच्या योजनांचा आढावा घेण्यासाठी खासदार तटकरे यांच्या अध्यक्षतेखालील संत रोहिदास सभागृहात आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला माजी नगराध्यक्षा स्नेहल जगताप, उपजिल्हाधिकारी प्रफुल्ल सानप, तहसीलदार महेश शितोळे , माजी सभापती चंद्रकांत जाधव, सुभाष निकम, राष्ट्रवादी चे तालुकाध्यक्ष निलेश महाडीक हनुमंत जगताप, जि प माजी अध्यक्षा अपेक्षा कारेकर, धनंजय देशमुख यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी तसेच महाड पोलादपूर तालुक्यातील सरपंच व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी खा तटकरे यांनी जलजीवन, सार्वजनिक बांधकाम विभाग, पंचायत समिती, एमआयडीसीसह महाड नगरपालिकेच्या कारभारवर तीव्र नाराजी व्यक्त केली. मी कुठल्याही व्यक्तिच्या विरोधात नाही मात्र प्रवृत्तीच्या विरोधात आहे, त्यामुळे अधिका-यांनीही कुठल्याही मोहाला बळी न पडता प्रामाणिकपणे जनतेला न्याय द्यावा असे आवाहन खा सुनिल तटकरे यांनी या वेळी केले.

महाड नगरपरिषदेच्या कारभारावर माजी उपनगराध्यक्ष रमेश वैष्णव, नगराध्यक्ष संदीप जाधव, प्रमोद महाडीक यांनी आक्षेप घेत तीव्र संताप व्यक्त केला. नगरपरिषदेने पाण्याचे नियोजन न केल्यामुळेच शहरावर सध्या पाणी टंचाई संकट ओढवले असल्याचा आरोप माजी नगराध्यक्षा स्नेहल जगताप यांनी यावेळी केला. मुस्लिम कबरस्थानाच्या जागेच्या प्रश्नावर बोलताना माजी नगराध्यक्ष महमदअली पल्लवकर यांनी दफनकरण्याठी जागा कमी पडत असल्याने मोठी अडचण निर्माण झाली असल्याचे सांगितले, याबाबत त्वरित कार्यवाही करण्याच्या सुचना तहसीलदारांना देण्यात आल्या. बैठकीच्या सुरुवातीला काश्मिरमधील पहेलगाम येथे अतिरेक्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्याचा निषेध करून या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.




# खोपोलीत पाणीटंचाई गंभीर, एकवेळच पाणीपुरवठा

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली शहरातील पाणी टंचाई दिवसेंदिवस गंभीर बनत असून , विविध रहिवासी भागांतील इमारतीत लाखो रुपयांचे घर खरेदी करून राहणाऱ्या कुटुंबांना हंडाभर पाण्यासाठी कासावीस व्हावे लागते आहे .



एप्रिल महिन्याच्या पहिल्या आठवड्यातच शहरातील बहुसंख्य कूपनलिका कोरड्या पडल्या आहेत . त्यामुळे मोठ्या प्रमाणावर गृहसंकुले, बैठा रहिवासी भाग , वाड्या वस्त्या व व्यापारी संकुलाना नगरपालिकेकडून होणाऱ्या पाणीपुरवठावर अवलंबून राहावे लागत आहे. आशा परिस्थितीत नगरपालिका पाणीपुरवठा विभागाकडून साठवणूक टाक्यांपैकी एका मोठ्या टाकीचे दुरुस्ती व डागडुजीचे काम काढण्यात आले आहे .त्यामुळे पहिल्यांदाच दिवसातून एक वेळ पाणी पुरवठा करण्याची वेळ आली आहे. एक वेळ पाणीपुरवठा होत असताना अनेक भागांत अत्यंत कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याने, खोपोली शहरात यावर्षी उन्हाळी एप्रिल व पुढील मे महिन्यात तीव्र पाणी टंचाईचे चटके नागरिकांना सहन करावे लागणार आहेत.

बारमाही प्रवाहित असलेली पाताळगंगा नदीचे वरदान असून , खोपोली शहरातील नागरिकांना उन्हाळी दोन महिन्यांत तीव्र पाणी टंचाईचा सामना करावा लागतो हे येथील राजकारणी व नगरपालिका प्रशासकीय व्यवस्थेचे अपयश व नियोजन शून्य कारभाराचे उदाहरण असल्याची संतप्त प्रतिक्रिया शहरातील टंचाई ग्रस्त भागातील नागरिक व्यक्त करीत आहेत. उन्हाळी दिवस , बोअरिंग कोरड्या पडल्या असताना , पाणी साठवणूक टाकीची डागडुजी करण्याचे काम नगरपालिका पाणीपुरवठा विभागाकडून काढण्यात आले व या कामाला प्रशासकीय मंजुरीची मिळाली कशी असा प्रश्न सर्वसामान्य नागरिक विचारत आहेत .

**पाण्याची मोठी गळती रोखण्यासाठी व मे महिन्यात पाणी पुरवठा सुरळीत होण्यासाठी पाणी साठवणूक यंत्रणेतील एका टाकीचे दुरुस्ती व डागडुजीचे काम युद्ध स्तरावर सुरू आहे.दरम्यान शहरातील सर्व भागातील नागरिकांना योग्य प्रमाणात पाणीपुरवठा होण्यासाठी पाणीपुरवठा विभाग सतत प्रयत्नशील आहे.**

**-डॉ. पंकज पाटील,**
**मुख्याधिकारी, खोपोली**

## दिवा-सावंतवाडी गाडीला पेणला थांबा द्या

**पेण : प्रतिनिधी**

पेण रेल्वेस्थानक येथे मध्य रेल्वे व मुंबई मंडळ अंतर्गत स्थानिक खासदार यांच्यासोबत दिनांक ३० एप्रिल रोजी मुंबई येथे होणाऱ्या चिंतन बैठकीच्या पार्श्वभूमीवर पेण प्रवासी संघ व समस्त पेणकरांनी राज्यसभा खासदार धैर्यशील पाटील यांना भेटून दिवा-सावंतवाडी गाडीचा पेण स्थानकावर थांबा १ मे महाराष्ट्र दिनापर्यंत पूर्ववत् करावा, अशी आग्रही मागणी केली आहे.

या वेळी दिवा-सावंतवाडी गाडीला थांबा का द्यावा, याचे सविस्तर संदर्भ, खासदारांना लेखी देण्यात आले

# ज्येष्ठ महिलेस मध्यरात्री 'शिवनेरी'तून सानपाडाऐवजी वाशीत उतरवले

**नवी मुंबई : बातमीदार**

एकीकडे महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ अर्थात एसटी चांगली चालण्यासाठी महाराष्ट्र सरकार आणि विशेष प्रयत्न करीत आहेत. तर दुसरीकडे एस टी महामंडळाच्या काही कर्मचाऱ्यांच्या मनमानी, उद्धट आणि प्रसंगी उद्धट वागणुकीमुळे प्रवासी त्रस्त होत असून संताप व्यक्त करीत आहेत.

नुकताच असाच एक संतापजनक प्रकार नवी मुंबईतील ज्येष्ठ महिला, सामाजिक कार्यकर्त्या अलका भुजबळ यांच्या बाबतीत घडला आहे. पुणे येथील घरगुती कौटुंबिक समारंभ आटोपून त्या शुक्रवारी संध्याकाळी पुणे स्टेशनवर आल्या .शिवनेरी बसचे तिकीट घेतानाच त्यांनी सानपाडा येथे उतरायचे असल्याचे सांगितले होते.

शिवनेरी बस संध्याकाळी ७.१० वाजता पुणे स्टेशनहून निघाली. बस रात्री अकराच्या सुमारास बस सानपाड्याजवळ पोहोचू लागल्याने आपल्याला सानपाड्याला उतरायचे आहे,असे सांगून त्यांनी वाहन चालकास बस थांबविण्यास सांगितले. एरव्हीही एस टी आणि खाजगी बस गाड्या या सानपाडा रेल्वे स्थानकासमोर थांबतच असतात. पण या बस चालकाने मध्यरात्रीची वेळ आहे. महिला प्रवासी एकटी आहे आणि त्यात पुन्हा सानपाडा रेल्वे स्थानकासमोर बस थांबविण्याऐवजी सानपाड्याला बस थांबणार नाही.तुम्हाला वाशीलाच उतरावे लागेल असे उद्धटपणे उत्तर दिले.

बस रात्री सव्वा अकराच्या सुमारास वाशी फ्लाय ओव्हरच्या खाली थांबवली. इतक्या रात्री तिथे रिक्षासुद्धा उपलब्ध नव्हती. त्यामुळे भुजबळ यांना तिथून पायी पायी वाशी रेल्वे स्टेशन गाठावे लागले. भुजबळ या कॅन्सरग्रस्त आहेत. त्यामुळे त्यांना भर भर चालता देखील येत नाही. शेवटी एका सज्जन रिक्षा चालकाने त्यांना सानपाडा येथे घरी आणून सोडले.

एकीकडे महिला दिवसेंदिवस ,असुरक्षित होत असताना केवळ सौजन्य म्हणूनच नाही तर त्यांची सुरक्षा लक्षात न घेता या बस चालकाच्या बेजबाबदार वागणुकीबद्दल एस टी महामंडळाने या कर्मचाऱ्याविरुद्ध कडक कारवाई करावी अशी अपेक्षा भुजबळ यांनी व्यक्त केली आहे.

पान १ वरुन

## पनवेलमधून नवी क्रिकेटरत्ने मिळतील

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या रूपाने जनमानसाला आवश्यक असलेला लोकप्रतिनिधी पुन्हा मिळाला आहे. राजकारणात दुसरी टर्म मिळाल्यावर डोक्यात बडेजावची हवा जाते, पण आमदार प्रशांत ठाकूर चार वेळा आमदार होऊनही त्यांच्या डोक्यात कधीच मोठेपणाची हवा गेली नाही. तेव्हापण आणि आजपण त्यांच्या स्वभावात कुठलाच बदल झाला नाही, असेही त्यांनी म्हटले.

दिलीप वेंगसरकर स्वतः मेहनत घेतात. खेळाडूंचे मनोधैर्य वाढवतात. पुण्यामध्ये दिलीप वेंगसरकर यांच्या माध्यमातून अकादमी उभारली गेली आणि त्यातून गरीब कुटुंबामधील ऋतुराज गायकवाड देशासाठी खेळत आहे. त्या अनुषंगाने या अकादमीतूनही चांगले खेळाडू घडतील, असा विश्वास खासदार बारणे यांनी व्यक्त केला.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपल्या भाषणात सांगितले की, पनवेल महानगरपालिकेची २०१६ साली स्थापना झाली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १०० डेज टार्गेट संकल्पना आखली आणि यामध्येही महापालिका यशस्वी ठरली. अल्पावधीतच स्वच्छता पुरस्कार, विविध विकासकामे, नागरिकांशी कनेक्टीव्हिटी, नाविन्यपूर्ण संकल्पना व उपक्रम राबवत पनवेल महापालिकेने राज्यात व देशात आपल्या कार्याचा ठसा उमटवला आहे. या आंतरराष्ट्रीय क्रिकेट प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातून महत्त्वाकांक्षी आणि अत्याधुनिक सुविधा उपलब्ध झाली आहे. कुस्ती, कबड्डी, क्रिकेट अशा खेळांचे संकुल उभे राहत असतानाच नागरिकांच्या आरोग्यासाठी आरोग्य केंद्रांची साखळी निर्माण झाली आहे.

गावांसाठी मैदाने उपलब्ध झाली पाहिजेत यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपल्या भाषणातून या विषयावर लक्ष वेधले. ९५ गावांची जागा गावठाण सोडून बाकी जागा सिडको संपादित आहे. नागरी सुविधा कामे तसेच प्रत्येक मैदान मिळाले पाहिजे ही माझी व आमदार महेश बालदी यांची मागणी राहिली आहे. त्यामुळे प्रत्येक गावाला सामाजिक कार्यासाठी व खेळांसाठी मैदान सिडकोच्या माध्यमातून मिळाले पाहिजे, अशी आग्रही पुनर्मागणी या वेळी बोलताना त्यांनी केली. वेंगसरकर अकादमीत अनेक प्रतिभावंत खेळाडू निर्माण झाले आहेत; त्याचप्रमाणे पनवेल केंद्रातूनही दर्जेदार खेळाडू तयार होतील, असे सांगताना मंत्री आशिष शेलार आणि क्रिकेट यांचे अतूट नाते आहे. त्यामुळे या प्रशिक्षण केंद्रावरही त्यांचे कायम प्रेम राहणार असल्याचेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी अधोरेखित केले.

विधान परिषदेचे आमदार विक्रांत पाटील म्हणाले की, शहराचा जिवंतपणा टिकवून ठेवण्यासाठी शहराची कला, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रात समांतर वाढ होणे आवश्यक असते. शहराचा हा जिवंतपणा टिकवून ठेवण्यासाठी विविध विकासकामांबरोबरच या क्रिकेट अकादमीतून चांगले कार्य झाले आहे.

भारतीय क्रिकेट संघाचे माजी कर्णधार पद्मश्री दिलीप वेंगसरकर यांनी सांगितले की, या ठिकाणहून जाताना मैदानात वीटभट्टी, रिक्षा ट्रक पार्किंग दिसायची. आमदार प्रशांत ठाकूर, परेश ठाकूर, गणेश देशमुख यांना भेटलो आणि या ठिकाणी प्रशिक्षण केंद्र उभारण्याचा विषय मांडला. त्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. पनवेल परिसरात क्रिकेटविषयी खूप प्रतिभा आहे, मात्र टेनिस क्रिकेटवर जोर आहे. तो दूर करून लेदर क्रिकेटवर भर देण्यासाठी आणि येथून प्रतिभावंत खेळाडू निर्माण करण्यासाठी हे प्रशिक्षण केंद्र काम करणार आहे.

या ठिकाणी अनेक टूर्नामेंट होणार असून स्थानिक प्रशिक्षक घेणार असल्याचे सांगत वानखेडे स्टेडियम ज्यांनी तयार केले त्या ठेकेदाराकडून हे काम पूर्ण करण्यात आल्याचेही वेंगसरकर यांनी सांगितले तसेच १ मेपासून या ठिकाणी प्रशिक्षण सुरू होणार असून दोन ते अडीच हजार युवा खेळाडू येतील आणि त्यामधून ८० ते १०० खेळाडू निवडले जाणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक गणेश देशमुख यांनी सांगितले की, ही अकादमी पांढरा हत्ती ठरेल अशी शंका निर्माण होत होती, पण ती दूर झाली आहे. नुसते रस्ते, गटारे बांधून विकास होत नाही; तर शिक्षण, क्रीडा, सांस्कृतिक, कला हेपण तितकेच महत्त्वाचे आहे. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मागणीवरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून सिडकोकडून हा भूखंड सिडकोकडून हस्तांतरित करण्यात आला आणि या ठिकाणी आंतरराष्ट्रीय दर्जाची प्रशिक्षण अकादमी उभी राहून पनवेलच्या नावलौकिकात भर टाकणारे एक केंद्र साकारले गेले आहे.

पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी म्हटले की, तरुण पिढीमध्ये नवभारत घडवण्याची ऊर्जा आहे. योग्य ऊर्जा जर्मनी, जपानसारखे देश निर्माण करतात, तर अयोग्य ऊर्जा तालिबानसारखा देश घडवतो. योग्य ऊर्जेतून भविष्य निर्माण होते. सकारात्मक ऊर्जा घेत आमदार प्रशांत ठाकूर यांच्या संकल्पनेतून हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेट प्रशिक्षण केंद्र साकारले आहे. त्याचप्रमाणे पनवेल महानगरपालिका हद्दीतील विविध विभागात टेनिस कोर्ट, कबड्डी, कुस्ती, क्रिकेट व इतर खेळांचे क्रीडांगण उभारण्याच्या दृष्टिकोनातून पावले उचलली जात आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मंत्री आशिष शेलार यांचे मार्गदर्शन वेळोवेळी मिळत असते. त्यामुळे विकासकामांसोबतच क्रीडा संस्कृती चांगल्या पद्धतीने जपण्यात येत आहे. आमदार प्रशांत ठाकूर पनवेलच्या विकासासाठी नेहमी दक्ष असतात, तर मंगेश चितळे, गणेश देशमुख यांच्यासारखे चांगले आयुक्त लाभले. म्हणून विकास झपाट्याने झाले असल्याचेही परेश ठाकूर यांनी सांगितले.

प्रास्ताविकात आयुक्त व प्रशासक मंगेश चितळे यांनी सांगितले की, आमदार प्रशांत ठाकूर व परेश ठाकूर यांच्या संकल्पनेतून हे आंतरराष्ट्रीय प्रशिक्षण केंद्र साकारले आहे. साडेसात एकरमध्ये केंद्र असून यासाठी १४ कोटी ५५ लाख रुपये खर्च झाला आहे. १५० मीटर व्यासाचे क्रिकेट मैदान, पॅव्हेलियन इमारत तसेच इतर आवश्यक सुविधा या ठिकाणी आहेत. प्रत्येक वर्षी १० ते १९ वयोगटातील १०१ विद्यार्थ्यांना विनामूल्य प्रशिक्षण देण्यात येणार असून पनवेल महापालिका हद्दीतील ५० टक्के, उर्वरित जिल्ह्यासाठी २५, तर जिल्ह्याबाहेरील २५ टक्के असा कोटा प्रशिक्षणात असणार आहे तसेच या केंद्राचे मेंटेनन्स वेंगसरकर फाऊंडेशनच्या सीएसआरमधून होणार आहे.

या समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून आमदार महेश बालदी, रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी महापौर कविता चौतमोल, सौ. वेंगसरकर, भाजपचे ज्येष्ठ नेते अरुणशेठ भगत, शिवसेनेचे उपनेते बबन पाटील, जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, भाजपचे जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, ॲड. प्रकाश बिनेदार, उपाध्यक्ष जयंत पगडे, शिवसेनेचे प्रथमेश सोमण, माजी उपमहापौर चारुशीला घरत, सीता पाटील, जगदीश गायकवाड, माजी नगरसेवक अनिल भगत, ॲड. मनोज भुजबळ, विकास घरत, माजी नगरसेविका दर्शना भोईर, सुशीला घरत, रूचिता लोंढे, वर्षा नाईक, वृषाली वाघमारे, अतिरिक्त आयुक्त गणेश शेट्ये, उपायुक्त कैलास गावडे, भाजपचे नवीन पनवेल मंडळ अध्यक्ष दशरथ म्हात्रे, पनवेल शहर मंडळ अध्यक्ष सुमित झुंझारराव, तळोजा मंडळ अध्यक्ष दिनेश खानावकर, नेरे मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, आरपीआयचे शहर अध्यक्ष प्रभाकर कांबळे, मुख्य अभियंता संजय कटेकर यांच्यासह खेळाडू आणि क्रिकेटप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वेळी प्रशिक्षक, ज्येष्ठ खेळाडू, प्रतिभावंत ज्युनिअर खेळाडू यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधांनी सुसज्ज असलेल्या या केंद्रामुळे पनवेल परिसरातील नवोदित क्रिकेटपटूंना दर्जेदार प्रशिक्षण मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. क्रिकेट क्षेत्रात नवीन प्रतिभावान खेळाडू घडवण्यासाठी हे केंद्र उपयुक्त ठरणार आहे.

# सराईत दुचाकीचोर अटकेत



**११ वाहने हस्तगत**

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल रेल्वे स्टेशन परिसर तसेच इतर विभाग परिसरातून मोठ्या प्रमाणात गेल्या काही महिन्यापासून दुचाकी वाहने चोरीस जाण्याचे प्रकार वाढले होते. या अंतर्गत गुन्हे शाखा कक्ष २ पनवेल हे सदर चोरट्याचा शोध घेत असताना तांत्रिक तपास व गुप्त बातमीदाराद्वारे हा गुन्हेगार पळस्पे परिसरात असल्याची माहिती मिळाल्याने त्यांच्या पथकाने तेथे सापळा रचून त्याला ताब्यात घेतले असता त्याच्याकडून आतापर्यंत ११ दुचाकी चोरीच्या गाड्या हस्तगत करण्यात आल्या आहेत.

पनवेल शहर पोलीस ठाणे, कामोठे पोलीस ठाणे, खांदेश्वर पोलीस ठाणे अंतर्गत मोटार सायकल चोरीस जाण्याचे प्रमाण गेल्या काही महिन्यापासून वाढले होते. पोलिसांच्या पथकाने आरोपीचा शोध घेत असताना सदर आरोपी आदित्य ठाकूर (वय २२) हा पळस्पे परिसरात असल्याची गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाल्याने त्याला सापळा रचून ताब्यात घेतले.

यानंतर त्याने गुन्ह्याची कबूल दिली असून त्याने आतापर्यंत ११ दुचाकी चोरीची वाहने दिली आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने पनवेल शहर पोलीस ठाण्यातील ७ वाहने, १ कामोठे पोलीस ठाणे, १ खांदेश्वर पोलीस ठाणे, १ पेण पोलीस ठाणे, आदींचा समावेश आहे. या आरोपीच्या अटकेमुळे अजूनही चोरीचे गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

## मानसिक रुग्ण महिला बेपत्ता

**पनवेल :** मानसिक रुग्ण महिला ही पनवेल रेल्वे स्टेशन परिसरातून बेपत्ता झाल्याची घटना घडली असून तिचा शोध पनवेल रेल्वे पोलीस



करीत आहेत. एरेडला नागमणी (वय ६०, रा.डेरवली) असे या महिलेचे नाव असून उंची पाच फुट पाच इंच, अंगाने सडपातळ, रंगाने गहुवर्णीय, चेहरा उभट, नाक सरळ, केस काळे वाढलेले आहेत. तिच्या अंगात भगवी साडी व पिवळा ब्लाऊज आहे. या महिलेबाबत माहिती असल्यास त्यांनी पीएसआय यादव, म.पो. हवा.बोराटे (९८२१४२५४०४) व पो.शि.आर.एस.मुंडे (९०७५३११३९०) येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# छत्रपती शिवराय व डॉ. बाबासाहेबांची संयुक्त जयंती उत्साहात साजरी



**खारघर : रामप्रहर वृत्त**

भाजपच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची संयुक्त जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शनिवारी आयोजित केलेल्या या जयंती सोहळ्याला आमदार प्रशांत ठाकूर जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांची प्रमुख उपस्थिती होती.

या जयंती महोत्सवाला उत्तर रायगड जिल्हा भाजपचे सरचिटणीस नितीन पाटील, अॅड. प्रकाश बिनेदार, अमित जाधव, शहराध्यक्ष प्रवीण पाटील, दीपक शिंदे, माजी नगरसेवक नरेश ठाकूर, गुरुनाथ गायकर, माजी शहराध्यक्ष ब्रिजेश पाटील, कीर्ती नवघरे, किरण पाटील, अमर उपाध्ये, नितेश पाटील, अक्षय लोखंडे, अनिता जाधव, दुर्गादेवी अंभोरे, साधना पवार, सक्हेल बडोई, वासुदेव पाटील, माजी नगरसेविका आरती नवघरे, केतन नवघरे अनिल साबणे, सीता आचार्य, दुर्गा बन्सल, विद्या येवले, मुकेश सीना, सुभाष विरोचने, आशिष गाडे, विराज भोंगले आदी उपस्थित होते.



**पनवेल : संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनच्या वतीने रविवारी रक्तदान शिबिराचे आयोजन कामोठ्यात करण्यात आले होते. सुषमा पाटील विद्यालयात झालेल्या या रक्तदान शिबिराला पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट दिली. या वेळी महापालिकेचे माजी आरोग्य सभापती डॉ. अरुणकुमार भगत तसेच वसंत गौड, राकेश धुळप, शशिकांत शिवणकर, निलेश म्हात्रे, मनोज कुंदे यांच्यासह इतर मंडळी उपस्थित होती. दरम्यान, या शिबिराला मोठा प्रतिसाद मिळाला असून सुमारे ५०० ते ६०० रक्तदात्यांनी येथे रक्तदान केले.**

# भाजप कामोठे अध्यक्ष विकास घरत यांचा सत्कार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उत्तर रायगड जिल्हा भाजपच्या अंतर्गत पनवेल विधानसभा क्षेत्रातील नव्याने मडल अध्यक्षांची निवड करण्यात आली आहे. यामध्ये कामोठ्यातील मंडळ अध्यक्षपदी पनवेल महापालिकेचे माजी सभापती विकास घरत यांची नुकतीच निवड करण्यात आली होती. त्यांच्या सत्कार सोहळ्याचा आयोजन रविवारी (दि.२७) कामोठे येथील भाजपच्या जनसंपर्क कार्यालयात करण्यात आले होते.



या कार्यक्रमाला पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर उत्तर रायगड जिल्ह्याचे सरचिटणीस नितीन पाटील, कामोठेचे माजी अध्यक्ष रवी जोशी, माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, राजेश गायकर, हॅप्पी सिंग, भाऊ भगत, विजय चिपळेकर, प्रदीप भगत, राजेश गायकर, हर्षवर्धन पाटील, दामोदर चव्हाण, सुशील कुमार शर्मा, कुसुम म्हात्रे, हेमलता गोवारी, तेजस जाधव, प्रकाश पाटील यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

कामोठ्यातील भाजपच्या कार्यकर्त्यांनी प्रत्येक वेळी पक्षाची ताकद कामोठ्यात कशी वाढेल याचाच प्रयत्न केला आहे. जे जे उपक्रम पक्षाने तुम्हाला सांगितले तेथे उपक्रम तुम्ही यशस्वीरित्या राबवलेत. त्याबद्दल मी तुमचे अभिनंदन करतो, असे मत या कार्यक्रमावेळी पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी व्यक्त केले तसेच त्यांनी नवनियुक्त अध्यक्ष विकास घरत यांचे अभिनंदन करत पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या.

## स्वामी समर्थ समाधी दिन

**पनवेल :** चैत्र कृ. त्रयोदशीला स्वामी समर्थांचा समाधी दिन केला जातो. शनिवारी (दि. २६) पनवेल शहरातील गावदेवी पाडा येथील श्री स्वामी समर्थ मठात अक्कलकोट निवासी श्री स्वामी समर्थ महाराजांचा समाधी लीला सोहळा करण्यात आला. आंब्याची विशेष आरास साकारण्यात आली होती. स्वामी समर्थांचे पारायण, अभिषेक व विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. संध्याकाळी महाआरती, प्रसाद व भजन सोहळ्याने समाधी दिनाची सांगता करण्यात आली.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या देणगीतून गव्हाण विद्यालयात १० इंटरॅक्टीव्ह बोर्ड





## प्राचार्य गोवर्धन गोडगेंना सेवानिरोप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजला 'रयत'चे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वतीने विद्यालयास दिलेल्या दहा लाख रुपयांच्या देणगीतून प्रदान करण्यात आलेल्या दहा इंटरॅक्टिव्ह पॅनल बोर्डचा उद्घाटन समारंभ विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन अरुणशेठ भगत यांच्या हस्ते झाला.

दरम्यान, लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या उपस्थितीत कॉलेजचे प्राचार्य गोवर्धन चिंतामणी गोडगे यांना सेवानिरोप देण्यात आला.

अध्यक्षीय भाषणात लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर साहेब यांनी मुख्याध्यापक गोवर्धन गोडगे यांच्या विषयी प्रशंसोद्गार केली. यानंतर लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर यांच्या वतीने तंत्रज्ञानाच्या कक्षा अधिक रुंदाव्यात आणि विद्यार्थी व शिक्षक तंत्रस्नेही होवून आधुनिक तंत्रज्ञानातून विद्यार्थी अधिक कार्यक्षम, गुणवत्ता धारक होण्यासाठी विद्यालयास दिलेल्या दहा लाख रुपयांच्या देणगीतून प्रदान करण्यात आलेल्या दहा इंटरॅक्टिव्ह पॅनल बोर्डचे उद्घाटन झाले. या वेळी विद्यालयाच्या वतीने लोकनेते रामशेठ ठाकूर यांना सन्मानचिन्ह, वॉल व पुष्पगुच्छ देऊन विद्यालयाच्या वतीने कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

या समारंभासाठी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यासह विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन अरुणशेठ भगत, 'रयत'चे जनरल बॉडी सदस्य व जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमु, विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे जेष्ठ सदस्य अनंता ठाकूर व विश्वनाथ कोळी, ज्येष्ठ नेते जयवंत देशमुख, गव्हाणचे माजी उपसरपंच विजय घरत, वहाळचे माजी उपसरपंच अमर म्हात्रे, उलवे नोड महिला मोर्च्याच्या अध्यक्षा विधीज्ञ योगिता भगत, सुहास भगत, रघुनाथ देशमुख, अंकुश ठाकूर, साईचरण म्हात्रे, मदन पाटील, नामदेव ठाकूर, कुंदन मोकल, रयत को-ऑपरेटिव्ह बँकेचे संचालक किशोर पाटील, रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलच्या सदस्या ज्योत्स्ना ठाकूर, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर प्रमोद कोळी व रवींद्र भोईर, माजी मुख्याध्यापक चाळके, मोहिते, पाटील, पारगाव शाखेच्या मुख्याध्यापिका पुष्पलता ठाकूर, उलवे येथील सौ.शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयाचे मुख्याध्यापक दीपक भर्णुके, मोरु नारायण म्हात्रे विद्यालयाच्या प्राचार्या प्रणिता गोळे,भाले सर, जासई शाखेचे उपमुख्याध्यापक कुटे सर, रायगड विभागातील विविध शाखांचे मुख्याध्यापक व अध्यापक, अध्यापकेतर सेवक तसेच गव्हाण विद्यालयाचे उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, ज्युनिअर कॉलेजचे विभाग प्रमुख बाबुलाल पाटोळे, ज्येष्ठ शिक्षक देवेंद्र म्हात्रे, एकनाथ ठाकूर आदी उपस्थित होते.

प्रास्ताविक उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे यांनी, सूत्रसंचालन सागरकुमार रंधवे यांनी केले तर लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर यांनी आभार मानले.

# खारघरच्या रामशेठ ठाकूर कॉलेजमध्ये उद्या राष्ट्रीय परिषद

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्ष व परिसंवाद व कार्यशाळा यांच्या संयुक्त विद्यमान मंगळवारी (दि.२९) सकाळी १०.३० वाजता वाणिज्य व विज्ञान यांचा समन्वय : नाविन्य आणि विकासासाठी बहुविद्याशाखीय दृष्टिकोन या विषयावर आधारित एक दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले आहे.

या एक दिवसीय राष्ट्रीय परिषदेचा मुख्य उद्देश विज्ञान आणि वाणिज्य या दोन भिन्न पण पूरक शाखेतील विचारवंत, संशोधक आणि विद्यार्थी यांना एकत्र आणून नाविन्यपूर्ण आणि शाश्वत विकासासाठी बहुविद्याशाखीय दृष्टिकोन उभारणे हा आहे. या परिषदेमध्ये देशभरातील तज्ञ वक्त्ये आपले विचार मांडणार आहेत तसेच विज्ञान आणि वाणिज्य शाखेतील संशोधक विद्यार्थी व स्कॉलर्स, दिलेल्या प्रमुख व उप विषयांवर संशोधन लेखाच्या माध्यमातून सादरीकरण करतील.

या एक दिवसीय राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन सत्रात प्रमुख वक्ते डॉ. दिनेश काला, प्राचार्य आर के टी महाविद्यालय, उल्हासनगर व प्रमुख पाहुणे म्हणून जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे सचिव डॉ. एस.टी. गडदे उपस्थित राहणार आहेत तसेच वाणिज्य व विज्ञान शाखेतील नामवंत विचारवंत उपस्थित राहणार असून ते आपले विचार मांडतील तसेच ते नवीन कल्पना, संशोधन व उद्योगधंद्यांतील भागीदारीस चालना देण्याच्या गरजेवर भर देतील.

या परिषदेमुळे संशोधन आणि उद्योजकता यामधील दुवा अधिक दृढ होण्यास मदत होणार असून, संशोधक, प्राध्यापक व विद्यार्थ्यांना नव्या कल्पना आणि दृष्टीकोन मिळण्यास हातभार लागेल, असा विश्वास संयोजकांनी व्यक्त केला आहे. या एक दिवसीय राष्ट्रीय परिषदेसाठी वेगवेगळे उप विषय देण्यात आले आहेत त्यामध्ये प्रामुख्याने आर्टिफिशियल इंटेलिजन्स, कॉर्पोरेट गव्हर्नन्स, बिझनेस मॅनेजमेंट, ऑडिटिंग, सायबर सेक्युरिटी व एन्व्हायरमेंटल स्टडीज या विषयांचा समावेश आहे.

महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. माहेश्वरी झिरपे व प्रा. प्रथमेश उदेकर (संयोजक, एक दिवसीय राष्ट्रीय परिषद) यांनी मुंबईमधील व भारतातील विविध महाविद्यालयातील प्राध्यापकांना, संशोधक व स्कॉलर्स यांना या एक दिवसीय राष्ट्रीय परिषदेसाठी ऑनलाइन व ऑफलाइन नोंदणी करण्याची विनंती केली आहे. ही एक दिवसीय राष्ट्रीय परिषद यशस्वी होण्यासाठी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी खूप मेहनत घेत आहेत.

# सुट्टीच्या कालावधीत कर्नाळा अभयारण्याला पसंती

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील मिनी माथेरान म्हणून प्रसिद्ध असेलेले पर्यटकांचे आवडीचे ठिकाण म्हणून पनवेल हाकेच्या अंतरावर असलेले घनदाट अरण्याने घेरलेले आणि ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेले निसर्गरम्य ठिकाण म्हणून पाहिले जात असलेले कर्नाळा अभयारण्य सुट्टीच्या दिवसात पर्यटकांचे आवडीचे ठिकाण ठरत असून मुंबई ते पुण्यापासून उन्हाळी सुट्टीत पाच हजारच्यावर पर्यटकांनी अभ्यारण्यात हजेरी असलेले हे ठिकाण निसर्गप्रेमींचे आवडीचे ठिकाण ठरत असून पर्यटकांकडून आकारण्यात येणाऱ्या शुल्कातून वनविभागाच्या महसुलातसुद्धा भर पडत आहे.

पनवेल शहरापासून १२ किमी अंतरावर अतिशय सुंदर रमणीय व विविध प्रकारच्या वृक्षवेलींनी व पक्ष्यांनी समृध्द असे कर्नाळा अभयारण्य आहे. मुंबईपासून काही तासांच्या अंतरावर असलेल्या निसर्गरम्य ठिकाणी वर्षभर मोठ्या प्रमाणात पर्यटक येतात. लोणावळ्याप्रमाणे कर्नाळा उंचावर असल्याने येथील हवाही नेहमी थंड असते. निसर्ग, हवेतील गारवा आणि शांतता यांचा संगम असलेल्या या अभयारण्यात दोन प्रकारची वने आहेत.

**पर्यटकांची वाढती गर्दी**





याशिवाय रानखाटीक, ठिपकेवाला सातभाई, कस्तुर, शिंपी, गिधाड, मुनिया, नाचन, सुगरण, बया, सुरेल, खाचू कवटा, राखी धोबी, भारव्दाज, शामा, मोर, फुलटोचा, पावशा, बहिरा, कापशी घार, नीळकंठ, पोपट, सूर्यपक्षी, हरियल यासारखे सुमारे १३४ प्रजातींचे स्थानिक, तर ३८ प्रजातींचे स्थलांतरीय पक्षी कर्नाळा अभयारण्यात आढळतात.

दरम्यान, कडक उन्हामुळे हे पक्षी उन्हाळ्यात अडचणीत सापडतात. त्यांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत होती. अभयारण्य परिसरात पक्ष्यांसाठी तीन तलाव खोदण्यात आले असले तरी ते दरवर्षी डिसेंबर महिन्याच्या आले असले तरी ते दरवर्षी डिसेंबर महिन्याच्या गेल्यावर्षी लवकरच तलावातील पाणी बदलत्या हवामानामुळे आटले. त्यामुळे अभयारण्यात गेल्या काही वर्षांपासून उन्हाळ्यात तीव्र पाणीटंचाईला सामोरे जावे लागले होते. वास्तविक पाहता तलावात गाळ साठल्याने जलाशय उथळ झाले होते. दरम्यान, संपूर्ण अभयारण्यात पाण्यासाठी एकच बोअरवेल असून पाईपलाईनच्या माध्यमातून विश्रामगृहापर्यंत पाणी नेले जात होते, परंतु कडक उन्हाळ्यात हे पाणी पुरेसे पडत नव्हते.

### उन्हाळ्यातसुद्धा जाणवतोय गारवा

*विशेष म्हणजे १२ किमी क्षेत्र असलेल्या या अभयारण्यात कुंडया ठेवाव्या लागत होत्या, मात्र गेल्या वर्षी पाणीटंचाई निवारण्याकरिता अभयारण्य प्रशासनाने विश्रामगृहालगत असलेल्या सिमेंटच्या बंधाऱ्यातील माती आणि गाळ उपसला असल्याने उन्हाळ्यातसुद्धा गारवा जाणवत आहे.*

# शिव अलिंगन नाट्यप्रयोगाला गोवठणे येथे रसिकांचा प्रतिसाद

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील गोवठणे येथील जय हनुमान नाट्य मंडळाच्या वतीने गावदेवी भवानी मातेच्या यात्रेच्या निमित्ताने शिव आलिंगन या शिवचरित्रावर आधारित, ऐतिहासिक नाट्यप्रयोगाचे आयोजन काल गोवठणे रंगभूमीत करण्यात आले होते. या नाट्यप्रयोगाला रसिकांचा उदंड प्रतिसाद लाभला.



या नाटकाचे लेखन शारदाकुमार शिर्सेकर यांचे तर दिग्दर्शक पांडुरंग पाटील यांना नाटकातील पात्रे सजीव करण्यात यश आले आहे. निर्मिती लक्ष्मीकांत म्हात्रे यांची आहे. सूत्रधार सुरेश म्हात्रे यांच्या मेहनतीचे सोने झाले. सल्लागाराची भूमिका रामनाथ म्हात्रे यांनी पार पाडली. राजू म्हात्रे यांचे प्रासंगीक संगीत प्रेक्षकांना भावले. उदय तांगडी (ठाणे) यांची रंगभूषा उठावदार होती. वेशभूषा अमृत म्हात्रे, पार्श्वगायन जितेंद्र म्हात्रे यांचे आहे. जय हनुमान नाट्य मंडळाचे व राजा जोशी यांचे भव्य दिव्य नेपथ्य पाहून रसिक भारावून गेले. ध्रुवराज म्हात्रे यांच्या ध्वनी संकलनाने नाटकाची उंची वाढविली.

हेमांगी शैलेंद्र म्हात्रे, नरेंद्र वर्तक, कृष्णकांत म्हात्रे, शैलेंद्र म्हात्रे, निलेश म्हात्रे, अशोक म्हात्रे, प्रेम पाटील, जगन्नाथ वर्तक, रूपम म्हात्रे, आकाश पाटील, रोहन म्हात्रे, विवेक वर्तक, महेश पाटील, अतिश वर्तक, प्रदीप वर्तक, शितल अशोक म्हात्रे, संदेश म्हात्रे, साई म्हात्रे, क्रिश म्हात्रे, सुरेश वर्तक व आर्य म्हात्रे आदी कलाकारांच्या लक्षवेधी भूमिका आपापल्या भूमिकांना न्याय देऊन गेल्या. या वेळी विविध मान्यवर उपस्थित होते.

## संपादकीय

# प्रत्युत्तर मिळणार!

जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथे पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात २६ निष्पापांना आपले प्राण गमवावे लागले. त्यानंतर संपूर्ण देशभरात संताप व्यक्त असून जोरदार प्रत्युत्तर देण्याची मागणी होत आहे. जनभावना लक्षात घेत पंतप्रधान नरेंद्र मोदींनीही पाकिस्तानला इशारा दिला आहे.

**भारताचे नंदनवन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या काश्मीर खोऱ्यात शांतता नांदावी, विकासकामांना चालना मिळावी, तरुणांना रोजगार उपलब्ध व्हावा, स्थानिकांना संविधानिक अधिकार प्राप्त व्हावेत, लोकशाही मजबूत व्हावी आणि एकूणच जनजीवन सुरळीतपणे चालावे यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने ऑगस्ट २०१९मध्ये कलम ३७० रद्द केले आणि जम्मू व काश्मीरचा विशेष घटनात्मक दर्जा रद्द करून दोन केंद्रशासित प्रदेशांमध्ये विभाजन केले. जम्मू व काश्मीरमधील नागरिकांच्या उज्वल भवितव्यासाठी करण्यात आलेला हा बदल पाकिस्तानला पहावला नाही, कारण तेथील भूमी अशांत ठेवण्याचे प्रयत्न 'नापाक' असलेल्या शेजारी देशाकडून सातत्याने सुरू असतात. त्यासाठी त्यांनी काही संघटना पोसल्या असून स्थानिकांनाही हाताशी धरले जाते. पहलगाममधील बैसरन मैदानावर झालेल्या हल्ल्याची जबाबदारी टीआरएफ अर्थात द रेझिस्टन्स फ्रंट या दहशतवादी संघटनेने घेतलेली आहे, जी पाकिस्तानस्थित दहशतवादी संघटना लष्कर-ए-तैयबाची एक शाखा आहे. मोदी सरकारने जम्मू-काश्मीरमधील कलम ३७० रद्द करून या प्रदेशाचे दोन केंद्रशासित प्रदेशांमध्ये विभाजन केले. त्यानंतर टीआरएफ हा गट अस्तित्वात आला. तोपर्यंत काश्मीर खोऱ्यात हिजबुल मुजाहिदीन, लष्कर-ए-तैयबा, जैश-ए-मोहम्मद यांसारख्या दहशतवादी संघटना सक्रिय होत्या. २०१९पासून टीआरएफ संघटनेने हल्ल्यांची जबाबदारी घेण्यास सुरुवात केली. नुकताच या संघटनेने पुलवामानंतरचा मोठा हल्ला घडवून नरसंहार केला, ज्याची शिक्षा त्यांना मिळालीच पाहिजे. पहलगाम हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानविरोधात अनेक कठोर पावले उचलली आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ समितीच्या बैठकीत विविध निर्णय घेण्यात आले. यामध्ये १९६०चा सिंधू पाणी करार स्थगित करणे, अटारी-वाघा सीमा क्रॉसिंग बंद करणे, पाकिस्तानी लष्करी अधिकाऱ्यांना नवी दिल्लीतून हाकलून लावणे, सर्व पाकिस्तानी नागरिकांचे व्हिसा रद्द करून त्यांना त्यांच्या देशात पाठवून देणे आदींचा समावेश आहे. त्याचबरोबर सुरक्षा यंत्रणांनी संशयित दहशतवाद्यांची घरे उद्ध्वस्त केली आहेत. अनेकांना ताब्यात घेऊन त्यांची चौकशी करण्यात येत आहे. विशेष म्हणजे तिन्ही सैन्य दले पूर्ण ताकदीनिशी सज्ज आहेत. त्यामुळे पाकिस्तानच्या मंत्री, अधिकाऱ्यांनी फुकाची दर्पोक्ती थांबवावी. भारताने जर मोठी कारवाई केली तर ते तुम्हालाच भारी पडेल हे लक्षात घेतले पाहिजे. मन की बात कार्यक्रमात बोलताना पंतप्रधान मोदींनी या हल्ल्यातील गुन्हेगारांना आणि कट रचणाऱ्यांना कठोर प्रत्युत्तर दिले जाईल, असा थेट इशाराच दिला आहे. दहशतवादाविरुद्धच्या या युद्धात देशाची एकता, १४० कोटी भारतीयांची एकजुट ही सर्वात मोठी ताकद आहे आणि तिच दहशतवादाविरुद्धच्या आपल्या निर्णायक लढाईचा आधार आहे. त्यामुळे विघ्नसंतोषींनो सावधान! तुमचा हिशोब येत्या काळात निश्चितपणे होणार आहे. त्यापासून तुम्हाला कुणीही वाचवू शकत नाही.**

# चोरीच्या घटनांत वाढ; नागरिकांचा हवा सहभाग



## खबरबात

विजय मांडे

कर्जत तालुक्यात विशेषतः शहरी भागात म्हणजे कर्जत शहर आणि नेरळ शहरामध्ये सातत्याने चोरीच्या घटना घडत आहेत. मग ती दुकान फोडी असो, मंगळसूत्र खेचून नेणे असो, घरफोडी असो किंवा जनावरांची चोरी असो या घटना वारंवार होतच असतात. अनेक वर्षे तालुक्यात दरोड्याचा घटना झाल्या नाहीत. मात्र अन्य चोऱ्या सुरूच आहेत. अर्थात त्याच्या बंदोबस्तासाठी पोलीस यंत्रणा कमीच पडणार कारण कर्जत आणि नेरळ पोलिस ठाण्यात मनुष्यबळ कमी आहे. त्यामुळे नागरिकांच्या सहभागा शिवाय चोरीच्या घटनांना आळा बसणार नाही. हे कटू सत्य आहे.

९० च्या दशकाच्या मध्यंतरी चोरीच्या घटना वाढल्या होत्या. त्यावेळी ग्रामस्थांनी गस्त घालण्यास सुरुवात केली होती. त्यावेळी लोकसंख्या कमी असल्याने प्रत्येकाला दिवसाआड गस्तीसाठी जावे लागत असे. प्रत्येक गावात ग्रामस्थांची गस्ती पथके होती. पोलीस ठाण्यांकडून 'पोलीस मित्र'अशी ओळखपत्र गस्त घालणाऱ्यांना देण्यात आली होती. आता तर लोकसंख्या दुप्पट – तिप्पट झाली आहे. २००५ साली लोकसंख्या खूप कमी होती. कर्जत ग्रुप ग्रामपंचायत असताना म्हणावा तितका विकास त्यावेळी झाला नव्हता. त्याचे एकमेव कारण म्हणजे पाणी टंचाई. काही राजकारण्यांच्या प्रतिष्ठेमुळे पेज नदीचे पाणी कर्जत पर्यंत येऊ शकले नाही. मात्र २००६ मध्ये पेज नदीच्या पाण्यावर कर्जत वाढीव पाणी पुरवठा योजना सुरू झाली आणि बघता बघता कर्जतचा विकास झपाट्याने होऊ लागला. आता तर कर्जत नगरपरिषद हद्दीत बोटावर मोजण्या इतकेच भूखंड विकसित होण्यासाठी राहिले आहेत. कर्जत शहरात वाड्यांच्या इमारती झाल्या. एका वाड्यात एका कुटुंबाऐवजी इमारत झाल्याने ४० – ५० कुटुंबे आली. त्यामुळे चोऱ्याही वाढल्या आहेत. कर्जत हे महत्वाचे रेल्वे स्थानक असल्याने अगदी रात्रभर प्रवासी सेवा सुरू असते त्यामुळे चोर चोरी करून लगेचच लोकल किंवा एक्सप्रेस पकडून पळून जातात आणि पोलिसांना तपास करणे अवघड होऊन बसते.

तीस – बत्तीस वर्षांपूर्वी दरोडे पडत असत. असाच दरोडा १९९२ साली कडाव मध्ये पडला होता. त्यावेळी श्री बाल दिगंबर देवस्थानचे अध्यक्ष भालचंद्र तथा भाऊ उपाध्ये आणि कडवमधील मोठे व्यापारी शंकर भोपतराव यांच्या घरावर एकाच रात्रीत घरातील पुरुषांवर हल्ला करून त्यांना गंभीररीत्या जखमी करून लाखोंचा ऐवज दरोडेखोरांनी चोरून नेला होता. या दोन्ही व्यक्ती दहा – पंधरा वर्षांपूर्वी स्वर्गवासी झाल्या तरी त्या दरोडेखोरांचा तपास अद्याप लागला नाही. विशेष म्हणजे उपाध्ये यांचा एक सुपुत्र सैन्यात होता. त्यानेही अगदी वरच्या पातळीवरून तपास व्हावा यासाठी पत्र व्यवहार केला होता. त्याचाही काही उपयोग झाला नाही.त्यानंतर तालुक्यात दरोडा पडल्याच्या घटना घडल्या नाही असे नाही. कर्जत शहरातील अतुल झुंजारराव यांच्या घरी सुद्धा दरोड्यासारखाच प्रकार झाला होता. त्यावेळी त्यांच्या वडिलांना मारहाण केली होती. त्यामुळे ते गंभीर जखमी झाले होते. गेल्याच आठवड्यात कर्जत नगरपरिषद हद्दी लगत असलेल्या किरवली ग्रामपंचायती मधील मालवाडी गावात चोरी झाली. अठरा तोळे सोन्याच्या दागिन्यांवर चोरांनी डल्ला मारला ते सुद्धा घरात माणसे असताना. म्हणजे चोरट्यांचे मनोधैर्य किती वाढले आहे. हे या चोरीवरून दिसते.

चोऱ्यांचे प्रकार वेगवेगळे आहेत. घरात कुणी नसताना घरफोडी करण्याचे प्रमाण जास्त आहे. रात्रीच्या वेळी दुकानांचे शटर कटावणीने किंवा जॅकने उचकटून चोरी करण्याचे प्रकार होत असतात. दुकान फोडीत जास्त ऐवज जात नाही. सुटी नाणी किंवा किरकोळ रकमेची चोरी होते. मात्र उचकटलेले शटर दुरुस्त करण्यासाठीचा खर्च चोरीच्या रकमेच्या दहा – वीस पट येतो. या चोऱ्या सी सी टीव्ही कॅमेरात कैद होत असतात. मात्र त्याचा तपास कधीच पूर्ण होत नाही. हे कटू सत्य आहे. कत्तलीसाठी चोरून नेणाऱ्या जनावरांच्या घटना सर्रास घडत आहेत. अनेक वेळा विश्व हिंदु परिषदेच्या कार्यकर्त्यांनी किंवा पशुप्रेमींनी या चोरांना पकडून पोलिसांच्या हवाली केले आहे. या चोऱ्या पकडल्यामुळे माहीत झाल्या परंतु अशा किती तरी जनावरांना कत्तलखान्यात नेण्यात येते याची निश्चितच गणती नसावी. गेल्याच पंधरवड्यात अनेक जनावरांची सुटका करण्यात आली तर परवाच सावेळे गावात काही जनावरांची सुटका करण्यात आली होती.

अलीकडेच म्हणजे ऑगस्ट २०१८ मध्ये एक विचित्र दरोड्याची घटना किरवली कॉलनीत परिसरातील महेंद्र देशमुख यांच्या घरात मध्यरात्री दोनच्या सुमारास चोरटे घरात शिरले. ते सात जण होते. त्यावेळी घरातील काही लोक जागे झाले. त्यावेळी त्यांनी देशमुख यांच्या पत्नी सौ. दीपा यांच्या डोक्यात काहीतरी घातले आणि त्यांच्याकडून लॉकर मधील सोन्याचे दागिने काढून घेतले. त्या चोरांनी त्या सर्वांना एका खोलीत डांबून बांधून ठेवले. त्यांना दमदाटी करून त्यांच्या कडील काही सोन्याचे दागिने व पैसे घेतले. त्याने त्यांचे समाधान झाले नाही. मग त्यांनी बँकेचे एटीएम कार्ड देशमुखांकडून बळजबरीने घेतले व पाच जण तेथे थांबून दोघांना तेथून सहा – सात किलोमीटरवर असलेल्या डिकसळ येथील एटीएम केंद्रावर पाठवून पैसे काढून घेतले व कार्ड परत आणून दिले. या दरम्यान पैसे काढताना पिन कोड चुकीचा सांगितला असला तर गडबड होऊ नये म्हणून मोबाईल मधून काढलेले सिम कार्ड एका मोबाईल मध्ये टाकून तो मोबाईल देशमुखांकडे दिला. इतकेच नाही त्यांच्याच कारची चावी घेऊन त्यांची गाडी घेऊन हे दोघे पैसे काढायला गेले होते. तब्बल सव्वा दोन तास या दरोडेखोरांनी देशमुख कुटुंबियांच्या घरात ठाण मांडले होते. तर इतकी त्या चोरांची हिम्मत झाली होती. या विचित्र चोरीचा तपास तत्कालीन पोलीस निरीक्षक सुजाता तानवडे यांनी शिताफीने लावला. त्यात टीप देणारा स्थानिक ग्रामस्थ व दोन सोनार आशा दहा जणांना ताब्यात घेतले होते. त्यानंतर देशमुख यांना सोन्याचे दागिने व रोकड सुद्धा परत मिळाली. एखाद्या सिनेमात घडावी. अशी घटना ही घडली होती.

सुयोग नगर मध्ये गेल्या दोन वर्षात अनेक चोऱ्या झाल्या मात्र एकाही चोरीचा तपास लागला नाही. असे तेथील रहिवाशांचे म्हणणे आहे. अशा अनेक घटना होत आहेत. एकाच वेळी चार – पाच दुकाने फोडली जातात. परवाच डिकसळ येथील पेढी तून चोरी केलेल्या एका चोराला नेरळ पोलिसांनी पकडले आहे. पोलीस आपले काम करतात परंतु त्यांनाही मर्यादा आहेत. मोटार सायकल चोऱ्या होत असतात. महिलांच्या गळ्यातील मंगळसूत्र किंवा सोन्याची चैन खेचून नेण्याचे प्रकारही होत आहेत. अलीकडे तांब्याच्या तारे साठी विद्युत रोहित्र चोरीच्या घटनाही घडत आहेत. रेल्वे परिसरात किंवा लोकल, लांब पल्ल्यांच्या गाड्यांमध्ये सुद्धा चोऱ्या होतात. त्यातील अनेक चोऱ्या उघडकीस येऊन तब्बल तीस वर्षांनी सुद्धा मुद्देमाल परत मिळाल्याचा घटना आहेत.

काही वर्षांपूर्वी पोलीस कर्मचारी कमी आहेत. यावर तोडगा काढण्यासाठी 'कर्जत शहर पोलीस ठाणे' स्वतंत्र केल्यास पोलीस निरीक्षक, पोलीस उप निरीक्षक, पोलीस सहाय्यक पोलीस निरीक्षक, हवालदार व पोलीस कर्मचारी अशी शंभर जणांची टीम असेल. त्यामुळे ग्रामीण पोलीस ठाणे स्वतंत्र होईल. परंतु राज्य सरकारच्या धोरणांमुळे त्याचा निर्णय झाला नाही. तो निर्णय झाल्यास पोलीस ठाण्यात मनुष्यबळ वाढेल व सारे प्रश्न सुटतील. हे खरे असले तरी सध्या नागरिकांनीही गस्त्या सुरू केल्या तर चोऱ्यां मध्ये निश्वतच फरक पडेल. शेवटी लोक सहभाग महत्वाचा आहे.

## बदलते तंत्रज्ञान

### व्हॉट्सॲप इमेज स्कॅम म्हणजे काय?

ऑनलाइन फसवणुकीची एक नवीन पद्धत आहे. यामध्ये, फसवणूक करणारा व्यक्ती एका अनोळखी नंबरवरून फोटो पाठवतो. या फोटोमध्ये एक धोकादायक लिंक लपलेली आहे. एखाद्याने त्या फोटोवर किंवा लिंकवर क्लिक करताच, त्याच्या फोनमध्ये व्हायरस किंवा हॅकिंग ॲप इन्स्टॉल होते. तंत्रज्ञानाच्या भाषेत, याला 'ट्रोजन हॉर्स अटॅक' किंवा 'रिमोट क्सेस ट्रोजन' (RAT) घोटाळा असेही म्हणता येईल, कारण यामध्ये फसवणूक करणारे वापरकर्त्याच्या फोनवर ताबा मिळवतात.





सायबर तज्ञ ईशान सिन्हा म्हणतात की जर एखाद्या प्रतिमेला व्हायरस (मालवेअर) ची लागण झाली असेल, तर ती फक्त डाउनलोड केल्याने किंवा उघडल्याने तुमचा फोन धोक्यात येऊ शकतो. बऱ्याचदा या इमेज फाइल्समध्ये धोकादायक कोड किंवा स्क्रिप्ट लपलेले असतात, जे फोनमध्ये आपोआप इन्स्टॉल होतात आणि तो हॅक होऊ शकतो. हे विशेषतः JPEG, PNG, GIFसारख्या प्रतिमा स्वरूपात देखील होऊ शकते.

व्हॉट्सप इमेज स्कॅम टाळण्यासाठी सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे तुमची सतर्कता. जर तुम्हाला एखाद्या अनोळखी व्यक्तीकडून कोणताही फोटो, कागदपत्रे किंवा लिंक मिळाली, तर ती तपासल्याशिवाय उघडू नका. कधीकधी या फाइली सामान्य दिसतात, परंतु त्यामध्ये लपलेला व्हायरस तुमच्या फोनमध्ये प्रवेश करू शकतो आणि तुमची वैयक्तिक माहिती चोरू शकतो.WhatsApp 'ऑटो-डाउनलोड' सेटिंग्ज बंद करण्यासाठी तुम्ही या पायऱ्या फॉलो करू शकता.WhatsApp CKS>m आणि तीन बिंदू (î) वर टॅप करा.यानंतर, सेटिंग्ज पर्यायावर जा आणि स्टोरेज आणि डेटा वर जा.येथे तुम्हाला मीडिया ऑटो-डाउनलोडमध्ये मोबाईल डेटा, वाय-फाय आणि रोमिंगचे पर्याय मिळतील. प्रत्येक पर्यायावर जा आणि सर्व चेकबॉक्सेस (फोटो, ऑडिओ, व्हिडिओ, कागदपत्रे) साफ करा. यानंतर, ओके पर्यायावर टॅप करा.आता व्हॉट्सपमध्ये कोणतीही मीडिया फाइल आपोआप डाउनलोड होणार नाही.

हे टेलिग्राम, फेसबुक मेसेंजर, ईमेल सारख्या कोणत्याही मेसेजिंग प्लॅटफॉर्मवर देखील होऊ शकते. म्हणून, कोणतीही अनोळखी लिंक किंवा फोटो उघडण्यापूर्वी काळजी घ्या.

# साहित्यिक मधु मंगेश कर्णिक



## निमित्त

आपल्या आगळ्यावेगळ्या व विपुल साहित्यनिर्मितीचे स्वतंत्र स्थान निर्माण करणाऱ्या लेखकांत मधू मंगेश कर्णिक यांचे नाव महत्त्वपूर्ण आहे. मधु मंगेश कर्णिक यांचा जन्म. २८ एप्रिल १९३१ रोजी करुळ, ता. कणकवली, जि. सिंधुदुर्ग येथे झाला. प्राथमिक शिक्षण करुळ येथील शाळेत तर कणकवली येथे माध्यमिक शिक्षण झाले. इच्छा असूनही त्यांना प्रतिकूल परिस्थितीमुळे पुढे शिक्षण घेता आले नाही. ९ फेब्रुवारी १९५२ रोजी एस.टी. कॉपरेरेशनमध्ये ज्युनिअर क्लार्क म्हणून नोकरीस लागलेल्या कर्णिकांनी साहित्य निर्मितीसही सुरुवात केली.

त्यांची पहिली कथा कृष्णाची राधा ही रत्नाळकर मासिकातून प्रसिद्ध झाली.'कोकणी गं वस्ती' हा त्यांचा पहिला कथासंग्रह. कथा, कविता, नाटक, कादंबरी, ललित गद्य, बालवाङ्मय, अशा सर्वच साहित्यप्रकारांमध्ये लेखन केले . मधु मंगेश कर्णिक यांनी आशयाच्या अंगाने मराठी कादंबरीत वैविध्य आणले. देवकी, सूर्यफूल, निरभ्र, माहीमची खाडी, भाकरी आणि फूल, जेईली, सनद, कातळ, वारुळ, संधिकाल या कादंबऱ्या प्रकाशित झाल्या. ज्या भूमीशी आपली नाळ बांधली गेली आहे, त्या भूमीशी आत्मियतेने बंध राखून आणि आपल्या अनुभव विश्वाशी निगडित राहून त्यांनी प्रदीर्घकाळ कथालेखन केले. कोकणी गं वस्ती, पारघ, तोरण, मंत्र, भुईचाफा, मांडव, गुजा, संकेत, तहान, डोलकाठी, झुंबर, केवढा, गवळण, अनिकेत, उत्तरायण इत्यादी ४१ कथासंग्रह प्रकाशित झाले आहेत. मधु मंगेश कर्णिक कथाकार, कादंबरीकार म्हणून सुप्रसिद्ध आहेत. इतर चौफेर लेखनही त्यांनी केले असून ते कवीसुद्धा आहेत. त्यांचा 'शब्दांनो, मागुते या' हा पहिला काव्यसंग्रह २८ एप्रिल २००१ रोजी प्रकाशित झाला. त्यात ८५ कविता आहेत. मधु मंगेश कर्णिक यांची ललित गद्यात समाविष्ठ होणारी दहा पुस्तके आहेत. १) सोबत, २) नैऋत्येकडचा वारा, ३) जिवा भावाचा गोवा, ४) माझा गाव माझा मुलुख या पुस्तकांचा समावेश होतो.त्यांनी 'देवकी' व 'केला तुका झाला माका' ही दोन नाटके लिहिली. दूत पर्जन्याचा हे चरित्र, जगन्नाथ आणि कंपनी, शाळेबाहेरील सौंगडी, चिमणचारा, गोड गोड चिमणचारा ही खास लहान मुलांसाठी लिहिलेली पुस्तके प्रकाशित झाली आहेत. कर्णिक यांच्या 'स्वप्नपूर्ती' या कथेवर 'घुंगरू' हा हिंदी चित्रपट प्रकाश मेहरा यांनी दिग्दर्शित केला. भाकरी आणि फूल, जुईली, रानमाणूस या कथा-कादंबऱ्यांवर आधारित दूरदर्शन मालिका विलक्षण गाजल्या व लोकप्रिय झाल्या.

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष होते व राज्य मराठी विकास संस्थेचे अतिरिक्त संचालक आहेत. ते कोकण कला अकादमी, नाथ पै वनराई ट्रस्ट यांचे संस्थापकही आहेत. त्यांनी 'करूळ पंचक्रोशी शिक्षण प्रसार मंडळ' स्थापन केले आणि त्या मंडळाचे करूळ ज्ञानप्रबोधिनी हायस्कूलही सुरू केले. कोकण मराठी साहित्य परिषदेच्या स्थापनेत त्याचा सिंहाचा वाटा होता. कोकणातील मालगुंड येथे केशवसुतांचे सुंदर स्मारक उभारण्यासाठी त्यांनी अपार कष्ट घेतले. भारत सरकारने त्यांचा 'पद्मश्री' पुरस्कार देऊन गौरव केला आहे

## बातमीतील बात





## आरोग्य प्रहर

### सकाळी उठल्या उठल्या करा 'या' गोष्टी

आपला दिवस चांगला जावा, असे प्रत्येकाला वाटत असते त्यासाठी दिवसाची सुरुवात चांगली करणे खूप गरजेचे आहे. परंतु, चांगल्या सवयी लागल्यामुळे आपल्याला आपली दिनचर्या ही चांगली ठेवता येते; परंतु त्याउलट वाईट सवयींमुळे मात्र आपल्याला अनेकदा त्याचे दुष्परिणामच भोगावे लागतात. याचमुळे तुमच्या दिवसाची सुरुवात चांगली होणे गरजेचे आहे. 'होमिओ अमिगो'चे संस्थापक व सीईओ करण भार्गव यांनी तुमच्या सकाळच्या दिनचर्येत समाविष्ट करण्यासाठी सवयी सांगितल्या आहेत



१..सकाळी लवकर उठा –नियमित सकाळी लवकर उठावे. लवकर उठल्यामुळे मनाला शांतता मिळते आणि संपूर्ण दिवस आनंदात जातो.

२. पाणी प्या– उठल्यावर पाणी प्यायल्याने तुमचे शरीर पुन्हा हायड्रेट होते आणि तुमचे चयापचय सुरू होते.

३. व्यायाम करा– तुम्ही सकाळी व्यायाम करणे गरजेचे आहे. वॉक किंवा वर्कआउट किंवा योगासने केल्याने तुमचा मूड सुधारेल. त्यामुळे तुमची उर्जा पातळी वाढवेल आणि तुमच्या एकूण आरोग्यासाठी ते फायदेशीर ठरेल.

४. ध्यानधारणेचा सराव करा–काही मिनिटे ध्यान केल्याने ताण कमी होतो. ध्यान आणि व्यायाम केल्याने तुमचे मन आणि शरीर दोन्ही सक्रिय राहते.

५. तुमच्या दिवसाचे नियोजन करा–ध्येये आणि कामांना प्राधान्य दिल्याने दिशा मिळते. आज तुम्हाला कोणते काम पूर्ण करायचे आहे याचा प्लॅन तयार करा आणि स्वत:साठी ध्येय निश्चित करा. तुमच्या कामांमध्ये सर्वांत कठीण असलेलं काम तुम्ही आधी करा. मग यामुळे बाकीची कामे तुम्हाला करायला सोपे जातील त्यामळे तुम्हाला ताण कमी जाणवेल.

६. पौष्टीक नाश्ता करा– सकाळचा न्याहारी नेहमी आरोग्यदायी असावी. संतुलित आहार आवश्यक ऊर्जा पुरवतो आणि त्यामुळे एकाग्रतेच्या क्षमतेत सुधारणा होते.

७. स्नूझ बटण दाबू नका –अलार्म वाजल्यानंतर कित्येक जण स्नूझ बटन दाबून पुन्हा झोपतात. तसं न करता उठून व्यायाम करायला हवं.

८. स्क्रीन टाइम कमी –सकाळी उठल्यानंतर किंवा झोपण्यापूर्वी मोबाईलचा वापर कमी करा.

९. स्वतःवर प्रेम–सर्वात आधी स्वतःसाठी वेळ काढा आणि तुमच्या कामाबद्दल प्रेम दाखवा. त्यामुळे सकारात्मकता वाढेल.

# चई गावातील रस्त्यावर पाणीच पाणी!

**कर्जत : प्रतिनिधी**



पंतप्रधान ग्रामसडक योजनेमधून बनविण्यात आलेल्या ओलमन – कोतवाल वाडी – चई नांदगाव रस्त्याची अवस्था दयनीय झाली आहे. या रस्त्यावरील चई गावात असलेला रस्ता रस्त्यातून वाहणाऱ्या पाण्यामुळे खड्डेमय बनला आहे. या रस्त्यातून पावसाळ्यासारखे पाणी वाहत असून स्थानिकांना चालणे कठीण होऊन बसले आहे. जिल्हा परिषद बांधकाम विभाग आणि सार्वजनिक बांधकाम विभागाकडून खड्डेमुक्त रस्त्यांची कार्यवाही कधी होणार, असा प्रश्न स्थानिक ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे.

ओलमन ग्रामपंचायती मधील चई गावामधून जाणारा ओलमन नांदगाव रस्त्याची अवस्था दयनीय झाली आहे. या रस्त्यावरील चई गावाबाहेरील रस्त्यावर सतत खड्डे निर्माण झालेले असतात.हा रस्ता पंतप्रधान ग्रामसडक योजनेतून बनविण्यात आला होता आणि त्यानंतरच्या काळात अखंड असा एकदाही बनविला गेलेला नाही. वेगवेगळ्या भागात कामे करण्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडून केले जात आहे. त्यामुळे ओलमन पासून नांदगाव पर्यंत या रस्त्यावर खड्डे आहेत. त्यात नांदगाव गावापासून विठ्ठलवाडी फाटा या भागात तर रस्ता मातीमध्ये हरवला असून त्या ठिकाणी रस्ता डांबरी होता काय? हे शोधण्याची गरज निर्माण झाली आहे. तर चई गावामधील जिल्हा परिषदेची शाळा आणि पुढे हा रस्ता सध्याच्या कडक उन्हाळ्यात देखील पाण्याच्या डबक्यात हरवला आहे. रस्त्यात पावसाळा असल्यागत स्थिती झाली असून बांधकाम खात्याचे अधिकारी रस्ते व पाणी कसे येते पाहण्यासाठी फिरत नसल्याने स्थानिक ग्रामस्थांना त्या रस्त्याने चालत जाताना अंगावर चिखल किंवा पाणी उडण्याच्या भीती ग्रासले आहे.

स्थानिक ग्रामस्थ आणि भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ते कृष्णा शिंगोळे यांनी चई रस्त्यावरील खड्डे आणि त्यातून वाहणारे पाणी तसेच निर्माण झालेले डबके सार्वजनिक बांधकाम विभाग आणि जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या अधिकार्यांनी येउन त्याची पाहणी करुन रस्त्याची दुरुस्ती करावी, असे आवाहन केले आहे

# साळावच्या जिंदल विद्यामंदिर येथे युवा संसद सत्र उत्साहात



**मुरुड : प्रतिनिधी**

लोकशाही मूल्यांचा सन्मान करत आणि युवा नेतृत्वगुणांना चालना देत, जिंदल विद्या मंदिर, साळाव येथे युवा संसद सत्राचे उत्साहात आयोजन करण्यात आले होते इयत्ता ८ वी ते १२ वीच्या विद्यार्थ्यांनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

कार्यक्रमाचे आयोजन सामाजिक शास्त्र विभाग प्रमुख जयालक्ष्मी मेनन यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. त्यांना अफीह बशा, अनुजा साळुंखे आणि नयन पौळ यांचे मोलाचे सहकार्य लाभले. एकूण ४० विद्यार्थ्यांनी विविध मंत्रिपदांच्या आणि संसद सदस्यांच्या भूमिका साकारत संसद सत्राची हुबेहुब प्रतिकृती उभी केली.

आरव खेदू यांनी पंतप्रधानपद भूषवले, तर अद्रिता चक्रवर्ती यांनी विरोधी पक्षाच्या नेत्या म्हणून प्रभावी भूमिका बजावली. रिझा पटवी या सभापतीच्या भूमिकेत होत्या, तर कृतांशी शर्मा यांनी महासचिव म्हणून काम केले वन नेशन, वन इलेक्शन या विषयावर विद्यार्थ्यांनी मुद्देसूद विचार मांडले

# शिंपी समाजाची मुरुड येथे सभा; महामंडळ स्थापन करण्याची मागणी

**रोहा : प्रतिनिधी**



महाराष्ट्र राज्यात शिंपी समाज मोठा आहे. परंतु तो सगळीकडे विखूरलेला आहे. समाजाच्या १६–१७पोटजाती आहेत. त्या सर्व एकत्र आल्यास शिंपी समाजाचे विकास महामंडळ स्थापन करता येईल. त्यामुळे शासनाच्या विविध योजनांचा लाभ समाजातील सर्व घटकांना मिळेल. आपल्या समाज्याच्या दुर्बल व गरिबांसाठी अशा विकास महामंडळाची नितांत आवश्यकता आहे. असे श्री नामदेव शिंपी समाज सामाजिक संस्था रायगडचे अध्यक्ष पुरुषोत्तम मुळे यांनी शनिवार शनिवारी जिल्हा शिंपी समाज व मुरुड (जंजिरा )येथे विद्यमाने झालेल्या संयुक्त सभेत बोलताना सांगितले.

ते पुढे म्हणाले लवकरच पंढरपूर येथे श्री. विश्व संत शिरोमणी श्री. नामदेव महाराज यांचे भव्य –दिव्य आत्याधिणूक तंत्र ज्ञानाचा उपयोग करून स्मारक उभे राहणार आहे. या साठी रेल्वेने १०एकर जागा व महाराष्ट्र शासनाने १५कोटी व पंजाब शासनाने पाच कोटी रुपये निधी दिला आहे. सभेच्या सुरुवातीला पेहलगाम (काश्मीर) येथे झालेल्या भ्याड हल्ल्यात शहिद झालेल्या व समाज्याच्या निधन पावलेल्या व्यक्तींना श्रद्धांजली वाहण्यात आली. आणि दुःख व्यक्त करण्यात आले.

या सभेचे औचित्त साधून प्रसिद्ध डॉ. कैलास जवादे (प्रमुख प्रवक्ता, मुंबई )यांनी अवयव दान विषयी व्हिडीओ स्लाईड शो च्या मार्फत मेंदू, लिव्हर, किडनी हृदय, डोळे आणि त्वच्या शरीरातील दान करण्यात येणाऱ्या मुख्य अवयव यांची माहिती दाखवून अवयव दान करण्याची किती आवश्यकता आहे. चित्रफित द्वारे दाखविले. ते म्हणाले आपल्याकडे, रक्तदान, नेत्रादान जनजागृती होते ते चांगले आहे. परंतु अवयव दान केल्यास एखाद्याचा जिव वाचतो. म्हणून अवयव करण्याची किती आवश्यकता आहे हे सांगून यासाठी निरनिराळ्या संस्थानी पुढे येऊन जनजागृती करणे क्रमप्राप्त आहे. हे सांगितले. डॉ. कैलास जवादे सह त्यांची टीम उपस्थित होती. समाजाचे श्री. संदीप शिंत्रे यांच्या पुढाकाराने हा कार्यक्रम झाला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला श्री. सिद्धेश करंबे यांनी ओंकारा स्वरूपा व मुरुड भगिनी प्रतिभा बागडे व शिवानी नाझरे यांनी गीत सादर केले.अध्यक्ष श्री. पुरुषोत्तम मुळे यांना कोकण मराठी साहित्य परिषद शहीद भगत सिंग मित्र मंडळ कर्जत तर्फे रायगड साहित्य रत्नभूषण पुरस्कार, आदर्श पत्रकार, उत्कृष्ठ पत्रकार व सु लेखनअशा निरनिराळ्या पुरस्कारांनी त्यांचा गौरव केल्या बद्दल जिल्हा समाज्यातर्फे गौरव करून शाल, श्रीफळ व पुषगुच्छ प्रदान करून यथोचित सत्कार कारण्यांत आला.तसेच स्मिता सतिष मुद्राळे यांची महाराष्ट्र राज्य महिला शिंपी समाज सचिव पदी नियुक्ती बद्दल त्यांचाही गौरव कारण्यात आला. सुरवातीला मुरुड जंजिरा शिंपी समाजाचे अध्यक्ष विजय करंबे यांनी प्रास्ताविक केले.

# रिस स्मशानभूमीच्या दुरूस्तीची मागणी

**आपटा : बातमीदार**

मोहपाडा हद्दीतील रीस नाल्याजवळील स्मशानभूमीची अत्यंत दुरावस्था झालेली आहे पत्र्याची शेड पूर्ण खराब झालेली आहे जेथे अत्यंविदी केला जातो तेथील लोखंडी फ्रेम निघालेली आहेसर्व लोंखंडी सांगाडा खराब व सडला आहे. त्याची दुरुस्ती करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे

स्मशानभुमीत पाण्याची टाकी आहे पण तिथे पाणी नाही बं नळ सडला आहे तिथे बसणासाठी शेड हवी आहे आणि आता या भागामध्ये अंत्यविधीसाठी लाकडे मिळत नसल्याने अंत्यविधीसाठी लागणारी लाकडी आणण्यासाठी खोपोली किंवा इतर ठिकाणी जावे लागते . त्यामुळे येथे विद्युत दाहिनी सुरु करण्याची मागणी करण्यात येत आहे माझी वंसुधरा या योजनेतून येथे साफसफाई व रंगरंगोटी करावी. आजुबाजुला खुप झाडेझुडपे वाढली ती स्वच्छ करावी हातपाय धुणे व पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध करुन दिली जावी अशी ग्रामस्थाची मागणी आहे.

# जिल्ह्यात आज सेवा हक्क दिन कार्यक्रमाचे आयोजन

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ व महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग याबाबत जनजागृती करण्यासाठी सोमवार दि. २८ एप्रिल रोजी दु.१२ वा. जिल्हा नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय,अलिबाग येथे 'सेवा हक्क दिन' साजरा करण्यात येणार आहे. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून महिला व बालकल्याण मंत्री कु. अदिती तटकरे आणि रोजगार हमी योजना, फलोत्पादन व खारभूमी विकास मंत्री भरत गोगावले उपस्थित राहणार आहेत. याशिवाय विविध लोकप्रतिनिधी व मान्यवर यांची उपस्थिती राहणार आहे.

नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सेवा हक्कांबाबत माहिती मिळवावी, असे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले आहे.

वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी राम प्रहर

## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **सुरेंद्र हिम्मतराव ठाकूर** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे : विंधणे (५५३३२४)**
(**PU-ID : 19904617140**), **तालुका–उरण, जिल्हा–रायगड**

| गट क्रमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १७०/१<br>खाते क्रमांक :<br>१०१९४ | १ | ०.२३.८०<br>पो.ख. ०.०२.५०<br>**एकुण ०.२६.३०** | १.९४ |

**एकुण क्षेत्र ०.२६.३० गुंठ्याचे खरेदीखत**

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून **१४ दिवसांचे** आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**दिनांक : २८/०४/२०२५**

**सही/–**
**ॲड. निलेश बा. झंजाड**

बी–१०४ सफायर सी.एच.एस. भूखंड क्रमांक – ३३/३४, सेक्टर २२, कामोठे, तालुका–पनवेल, जिल्हा–रायगड –४१०२०६
मो. क्र. ९९२०४७५८०१

# साई येथे राज्य उर्दू शिक्षक संघटनेचा जिल्हास्तरीय मेळावा; आदर्श शिक्षक पुरस्कारांचे वितरण

## पुरस्कार्थी शिक्षकांची जबाबदारी वाढली – ना. आदिती तटकरे



**माणगाव : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य उर्दू शिक्षक संघटनेतर्फे देण्यात आलेल्या आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानीत झालेल्या सर्व पुरस्कार्थी शिक्षकांची जबाबदारी आज खऱ्या अर्थाने वाढली असल्याचे प्रतिपादन राज्याच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी साई येथे पुरस्कार वितरण सोहळा कार्यक्रमात बोलताना व्यक्त केले.

माणगाव तालुक्यातील अँड.हारून सोलकर हायस्कुल अँड जुनिअर कॉलेज साई याठिकाणी २६ एप्रिल रोजी महाराष्ट्र राज्य उर्दू शिक्षक संघटनेतर्फे जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार सन २०२४–२५ चा वितरण सोहळा आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य उर्दू शिक्षक संघटना अध्यक्ष एम.ए.गफ्फार उपस्थित होते.

या कार्यक्रमास रायगड जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्याध्यक्ष सुभाष केकाणे अँड.अमीन सोलकर, तहसीलदार दशरथ काळे,एच.के. देशमुख हायस्कुल तुडीलचे अध्यक्ष इकबाल चांदले,जेष्ठ नेते हुसेन राहटविलकर,अँड.मुबीन सोलकर साई ग्रामपंचायत सरपंच हवाबी राहटविलकर,उणेगावचे माजी सरपंच राजेंद्र शिर्के,महाराष्ट्र राज्य उर्दू शिक्षक संघटना सचिव ताजुद्दीन परकार,मध्यवर्ती शिक्षक संघटना रायगड जिल्हाध्यक्ष सोपान चांदे,माणगाव पंचायत समिती गटशिक्षणाधिकारी सुरेखा तांबट,जमातुल मुस्लिमीन साई अध्यक्ष इब्राहिम जुवले आदी मान्यवरांसह शिक्षक,शिक्षिका,पालक,विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना मंत्री अदिती तटकरे पुढे म्हणाल्या कि,शैक्षणिक क्षेत्रात ज्या शिक्षक व शिक्षक भगिनींनी उत्तम व उल्लेखनीय कामगिरी केली आहे त्या २९ शिक्षकांचा संघटनेतर्फे पुरस्काराने सन्मान करण्यात आला आहे. दरवर्षी मोजक्या शिक्षकांना त्यांची वर्षभराची कामगिरी विचारात घेऊन त्यांना पुरस्काराने सन्मानीत केले जाते. प्रत्येक शिक्षक हा पुरस्काराचा मानकरी असतो, परंतु एकाचवेळी सर्वाना पुरस्काराने सन्मानीत करता येत नाही. आज ज्यांना पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले आहे त्यांची जबाबदारी हि खऱ्या अर्थाने वाढली आहे. उर्दू शाळांना खासदार तटकरे साहेबांनी नेहमीच जास्तीत जास्त निधी देण्याचा प्रयत्न केला आहे. माझ्या आमदार निधीतून श्रीवर्धन मतदारसंघातील विविध शाळांमधून आपण शैक्षणिक साहित्याचे वाटप केले.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, रायगड येथील जिल्हा परिषद हद्दीतील नैना प्राधिकरण यांचे अधिकार क्षेत्रातील ग्रामपंचायत हद्दीतील मौजे-शिवकर , तालुका-पनवेल,जि.रायगड येथील जमीन मिळकत हि श्रीमती.कानुबाई नथुराम काळंबे उर्फ कोकंबे आणे इतर यांच्या सामाईक मालकीची ,ताबेकब्जातील, वापरातील व वाहिवाटीतील त्यांच्या कायदेशीर हिश्श्याची असलेली खालील परिशिष्टात वर्णन केलेली शेतजमीन आमचे अशील मे. श्री सिद्धिविनायक रियल इस्टेट तर्फे प्रोप. श्री.ज्ञानेश्वर सदाशिव डांगे ,रा-खारघर हे कायम स्वरूपी नोंदणीकृत खरेदिखत करणेचा व्यवहार ठरविला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे-शिवकर ,तालुका-पनवेल,जि.रायगड**

| गाव | सर्वे . नंबर | क्षेत्र हे. आर. पॉ | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| शिवकर | ३१५ | ०-९४-६०<br>पो.ख-०-०३-००<br>एकूण-०-९७-६० | ९.५६ |

सदरहू शेतजमीन या मिळकतीमध्ये अन्यकोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क,विकासन करार,हितसंबंध,कुळ,वहिवाट,ताबा,कब्जा,इंजमेंट,साठेकरार,गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीसीच्या तारखेपासून २१ दिवसाचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर, समक्ष वा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात.याप्रमाणे विहित मुदतीत कोणत्याही हरकती दाखल न झाल्यास वरील मिळकत हि निर्वेध व बोजरहित आहेत व हरकत असल्यास ती सोडून दिली आहे असे गृहीत धरून आम्ही वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित खरेदिखताचा व्यवहार पूर्ण करतील व विहित मुदतीच्यानंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतीस आमचे अशील हे कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाहीत.

ठिकाण: पनवेल
दिनांक: २७/०४/२०२५

सही / **अँड.पल्लवी अमृत मानकर**
बी.कॉम.,एल.एल.एम.,डी.सी.एल.
कार्यालयीन पत्ता : शॉप नं.१,आकाशदीप बिल्डींग, ऑपो. कनक सरोवर, ठाणा नाका रोड, जुने पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड. **मो. ८८३०४४८२९१**

Rayat Shikshan Sanstha's
**Professional College, Kamothe**
Sec – 11, Plot – 41, Kamothe, Panvel

## Notice Inviting Tender

Rayat Shikshan Sanstha's Professional College, Kamothe – Panvel, invites tenders for the interior work of college building from reputed contractors. Sale of tenders from 28/04/2025 at 11.00 am till 05/05/2025 upto 05.00 pm (excluding Government holidays). Submission of filled tender before 05.00 pm on 06/05/2025 at Professional College, Sec -11, Plot- 41, Kamothe, Panvel.

| Name of work | Estimated Cost | Blank Tender Cost |
|---|---|---|
| Interior Work of First floor | Rs. 37,00,000 /- | Rs. 1,000 /- |

sd/-
Chairman,
Professional College, Kamothe
Panvel

## महाराष्ट्र शासन

**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**अलिबाग सा.बां. विभाग,**
**अलिबाग पिन कोड – ४०२ २०१**

ई–मेल पत्ता :– alibag.ee@mahapwd.com दुरध्वनी/फॅक्स क्रमांक :– (०२१४१) २२२०८४/२२५०९६

**ई- निविदा सूचना क्र. २ सन २०२५-२०२६**

कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून सक्षम कंत्राटदारांकडून नोंदणीकृत कंत्राटदारांकडून ब–१ नमुन्यातील ई–निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित किंमत रुपये |
|---|---|---|
| १) | तळवली ते भोनंग फणसापूर रस्ता इजिमा ६५– कि.मी. ३/५०० ते ८/४०० मध्ये सुधारणा करणे ता. अलिबाग जि. रागयड | रु. १,२२,०६,७२६/– |

**ई–निविदा उपलब्ध कालावधी** :– दिनांक २८.०४.२०२५ (स.१०.००) ते दिनांक ५.०५.२०२५ (सं.१८.००)
**ई–निविदा उघडणे** :– दिनांक ०८.०५.२०२५ (दु.३.०० वा.) (अधीक्षक अभियंता, रायगड (सा.बां.) मंडळ, कोकणभवन, नवी मुंबई)

खालील संकेतस्थळावर ई–निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.
१. http://mahapwd.com २. http://mahatenders.gov.in
(सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)
३. कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग कार्यालयातील सूचना फलक.

**जा.क्र./ सा.बां./अवि/निविदा/ १६६७/२०२५**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**सा.बां. विभाग, अलिबाग–४०२ २०१**
**दिनांक :– २३/०४/२०२५**
**आरओसी–२०२५–२६/क्र–५/C३८४**

**सही/–**
**(ज.ई. सुखदेवे)**
कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग,
अलिबाग, जि.रायगड

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## E-TENDER NOTICE

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender** specification. **Tender fees Rs.500/- + GST**

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFxNo :- 7000035502**<br>**Tender No.: EE/EHV(O&M)/DN/PNL/e-Tender-43/2023 - 2024.**<br>RFx e-tender for work of providing and fixing of 200W LED Floodlights IP 65 on existing high mast towers at various Substation under EHV (O&M) Division Panvel… **2nd call.**<br>**Tender amount Rs. 31,13,699/-, EMD amount Rs. 31,137/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **29.04.2025, 18:00 Hrs. to 12.05.2025, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 12.05.2025 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **13.05.2025 at 11:00 hrs.(if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 9769213818
**Note :** All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**SD/-**
**EXECUTIVE ENGINEER, E.H.V.(O&M) DN. PANVEL**

# वसुंधरा रक्षण, संवर्धनावर भर

## नवी मुंबईत टाकाऊपासून टिकाऊ वस्तू निर्मिती

### कार्यशाळांमध्ये विद्यार्थ्यांचा उत्साही सहभाग

**नवी मुंबई : बातमीदार**

जागतिक वसुंधरा दिनापासून महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली नवी मुंबई महापालिकेच्या वतीने १ मेपर्यंत पर्यावरण संवर्धन अभियान राबविण्यात येत आहे. यामध्ये नागरिकांच्या सहभागातून विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत, तसेच शाळाशाळांमध्येही निसर्गाच्या पंचतत्त्वांविषयी आणि वसुंधरेच्या रक्षण-संवर्धनाविषयी विद्यार्थ्यांच्या सहभागातून जनजागृती करण्यात येत आहे.

या अंतर्गत गुरुवार, २५ मार्च २०२५ रोजी घरातील टाकाऊ वस्तूंपासून टिकाऊ वस्तू बनविणे या विषयावर नवी मुंबईमध्ये महानगरपालिकेच्या तसेच खाजगी शाळांमध्ये कार्यशाळा घेण्यात आल्या. यामध्ये आपल्या घरात निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे प्रमाण कमी करण्यासाठी टाकाऊ वस्तूपासून कल्पकतेने टिकाऊ वस्तू तयार करून कचरामुक्ती कशी करता येईल, याबाबत विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. त्यानंतर अशा टाकाऊपासून टिकाऊ वस्तू कशा बनवायच्या, याचे प्रात्यक्षिक शाळेच्या शिक्षकांनी



विद्यार्थ्यांना करून दाखवले व त्यांच्याकडून करवूनही घेतले.

यामध्ये प्लॅस्टिकच्या बाटल्यांपासून शोभेच्या वस्तू, फुलदाणी, शोपीस, झाडे लावण्याकरिता कुंड्या इ. वस्तूंबाबत शिक्षकांनी प्रात्यक्षिके करून दाखवली व विद्यार्थ्यांकडून वस्तू तयार करून घेतल्या.

या कार्यशाळेमध्ये शिक्षक, विद्यार्थी यांच्यासह काही शाळांमध्ये पालकही सहभागी झाले होते. शाळा शाळांमध्ये वसुंधरा संवर्धनाची व प्लास्टिक बंदीची सामूहिक प्रतिज्ञाही घेण्यात आली. नागरिकांनीही अभियानांतर्गत विविध उपक्रमांमध्ये सक्रिय सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले.

# जागतिक हिवताप दिनानिमित्त नवी मुंबईत विद्यार्थ्यांमध्ये जागृती

**नवी मुंबई : बातमीदार**

जागतिक हिवताप दिनाचे औचित्य साधून नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील इयत्ता सातवी ते दहावीच्या वर्गातील विद्यार्थ्यांना हिवतापाविषयी प्रशिक्षण देण्यात आले होते. या अंतर्गत २६ शाळांमधील ४ हजार ७४० विद्यार्थ्यांना नॉफीलीस व एडीस डासांची उत्पत्तीस्थाने तसेच डासांच्या आळ्या प्रत्यक्ष दाखवून तसेच घराभोवती व घरांतर्गत होणारी डासोत्पत्ती स्थाने दाखवून प्रात्यक्षिक स्वरूपात प्रशिक्षण देण्यात आले.

त्याचप्रमाणे नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र – करावे, शिरवणे व घणसोली कार्यक्षेत्रामध्ये सकाळी ७:३० ते ९:०० या वेळेत प्रभात फेरीचे आयोजन करण्यात आले. या प्रभातफेऱ्यांमध्ये ३७० विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन विविध म्हणी, घोषणाफलक उंचावत जनजागृती केली.

हिवताप / डेंग्यू आजाराबाबत जनजागृती होणेकरीता सार्वजनिक रुग्णालय नेरूळ, वाशी व ऐरोली येथे बाहयरुग्ण विभागात उपचाराकरिता आलेल्या रुणांमध्ये जनजागृती होण्यासाठी पथनाट्यांचे आयोजन करण्यात आले होते. तसेच डॉ. डी वाय पाटील नर्सिंग कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी देखील रायन इंटरनॅशनल स्कुल, नेरुळ येथे पथनाट्य सादर करुन विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती केली.

२५ ते २७ एप्रिल २०२५ या कालावधीत सिडको एक्झिबीशन सेंटर येथे महाराष्ट्र राज्य रेडीओलॉजिस्ट असोसिएशन यांनी रेडीओलॉजिस्ट डॉक्टरांची आंतरराष्ट्रीय परिषद आयोजत केली आहे. त्याचे औचित्य साधून त्या ठिकाणी देखील हिवताप / डेंग्यू आजाराबाबत जनजागृती शिबीरांचे आयोजन करण्यात आले आहे.

> **एडीस डासांची उत्पत्ती घरांमध्ये व घराभोवताली साठलेल्या स्वच्छ पाण्यात होत असल्याने सर्व पाण्याचे साठे झाकून ठेवावेत त्याचप्रमाणे घराबाहेरील अथवा टेरेसवरील भंगार नष्ट करावे, या माध्यमातून नवी मुंबईत हिवताप अथवा डेंग्यू आजारावर आळा घालणे शक्य होईल यासाठी नागरिकांनी योगदान द्यावे.**
> **–डॉ. कैलास शिंदे, आयुक्त, नवी मुंबई महापालिका**



# आमदार मंदा म्हात्रेंनी अनुभवली 'मन की बात'

**नवी मुंबई : बातमीदार**

बेलापूर विधानसभा क्षेत्राच्या कार्यसम्राट आमदार मंदा म्हात्रे यांच्या आग्रोळी येथील गौरव निवासस्थानी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा 'मन की बात' या रेडिओ कार्यक्रमाच्या १२१ व्या भागाचा कार्यक्रम १५१ बेलापूर विधानसभा क्षेत्रातील भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत झाला.

या वेळी भारत देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरुवात पहलगाममध्ये मृत्युमुखी पडलेल्यांचे स्मरण करून केली गेली. मन की बातचे आयोजन मंदा म्हात्रे यांनी मोठ्या पडद्यावर त्यांच्या निवासस्थानी केले होते. पंतप्रधानांना ऐकण्यासाठी भाजपचे पदाधिकारी उपस्थित होते.



जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे २२ एप्रिल रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या १२१व्या मन की बात कार्यक्रमात पुन्हा एकदा दहशतवादाचा मुद्दा उपस्थित केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पहलगाममधील पीडित कुटुंबांना न्याय देण्याचे आश्वासन दिले.

मन की बात मध्ये बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, जेव्हा मी तुमच्याशी मनापासून बोलतो तेव्हा माझ्या मनात खूप वेदना होतात. २२ एप्रिल रोजी पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्याने प्रत्येक नागरिकाला दुःख झाले आहे. प्रत्येक भारतीयाची शोकग्रस्त कुटुंबांबद्दल तीव्र सहानुभूती आहे. दहशतवादी आणि त्यांचे आका काश्मीर पुन्हा उद्ध्वस्त करू इच्छितात आणि म्हणूनच त्यांनी एवढा मोठा कट रचल्याचे मोदी म्हणाले.

या वेळी आमदार मंदा म्हात्रे यांच्या समवेत माजी जिल्हाध्यक्ष सी.व्ही.रेड्डी, गोपाळराव गायकवाड, राजेश रॉय, दर्शन भारद्वाज, अजय सिंग, ज्योती पाटील, कल्पना शिंदे, मनोहर बाविस्कर, भूपेंद्र चड्डा, विष्णू भिरूड, मनी कोणार, जयसिंग पवार, नारायण वाघमारे, विज्ञान म्हात्रे, चंद्रकात पाटील, संतोष कोळी, प्रवीण चिकणे, सुवर्णा चिकणे तसेच असंख्य कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

# नवी मुंबईतील मुस्लिमांकडून पहलगाम हल्ल्याचा निषेध

**नवी मुंबई : बातमीदार**

काश्मीर येथील पहलगाम येथे घडलेल्या आतंकवादी हल्ल्याचा निषेध करण्यासाठी त्याचप्रमाणे या हल्ल्यामध्ये मृत्यूमुखी पडलेल्या निष्पाप हिंदू पर्यटक नागरिकांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी नवी मुंबईतील मुस्लिम समाजातील नागरिक वाशी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये एकत्र जमले होते.

या वेळी आतंकवादी हल्ल्याचा तीव्र शब्दात निषेध करण्यात आला त्याचप्रमाणे मृत्युमुखी पडलेल्या सर्व बांधवांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. ह्या समयी मुन्नाभाई, इकबाल शेख,माजी परिवहन सभापती-अन्वर शेख, माजी नगरसेवक-जब्बार खान, समीर बागवान-माजी परिवहन सदस्य, नवी मुंबई घर बचाओ समिती अध्यक्ष-ख्वाजामियाँ पटेल, रउफ शेख,मुबीन काझी, दिलावर नळबंद, शमशुद्दीन अल्लाबक्ष, इद्रीस अन्सारी, हमीद शेख, अब्दुल शेख, सर्फराज हाजू, अन्वर शेख, शोएब शेख,समीर शेख इत्यादी मुस्लिम समाजाचे प्रतिनिधी उपस्थित होते.




# झाडांवर विद्युत रोषणाई केल्याबद्दल दंड

**नवी मुंबई : बातमीदार**

तुर्भे, सेक्टर १८ व सेक्टर १९ येथील हॉटेल बाहेरील झाडांवर विद्युत रोषणाई केली असल्याचे आढळून आल्याने तुर्भे विभाग कार्यालयाच्या भरारी पथकाने तुर्भे विभागाचे सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी सागर मोरे यांच्या नियंत्रणाखाली, उद्यान विभाग परिमंडळ १ चे उपायुक्त किसनराव पलांडे यांच्या मार्गदर्शनाखाली, या दोन्ही हॉटेल मालकांकडून प्रत्येकी १० हजार याप्रमाणे



एकूण २० हजार दंडात्मक रक्कम वसूली केलेली आहे.

नमुंमपा वृक्ष प्राधिकरणाचा २७ जानेवारी २०२५ रोजीचा ठराव क्र.७४६१ अन्वये वृक्षांवर खिळे ठोकणे, विद्युत रोषणाई करणे व वृक्षास इजा पोहचविणाऱ्या व्यक्ती, संस्था, व्यावसायिक यांचेवर दंडात्मक कारवाई करणेबाबत निर्णय घेण्यात आला असून अशा नागरिक / संस्था / व्यावसायिक यांचेकडून प्रतिवृक्ष रुपये १०,०००/- इतका दंड आकारणेबाबत सहाय्यक आयुक्त तथा वृक्ष अधिकारी यांचेमार्फत कारवाई करण्यात येत असते. त्यानुसार सदरची धडक कारवाई करण्यात आलेली आहे.

# पालकांनो, पाल्यांवर अपेक्षांचे ओझे लादू नका –अमेय महाजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पालकांनो, आपल्या पाल्यांवर अपेक्षांचे ओझे लादू नका. त्यांचा कल व कुवतीनुसार त्यांना त्यांच्या आवडत्या क्षेत्रात करिअर करू द्या. असे कळकळीचे आवाहन अमेय महाजन यांनी केले. येथील के. गो. लिमये सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालय आयोजित वसंत व्याख्यानमालेचे शनिवारचे दुसरे पुष्प उलगडताना स्पर्धा परीक्षा आजची तरुणाई आणि पालकांची भूमिकाया विषयावर ते बोलत होते.

तरुणाई विषयी बोलताना ते म्हणाले,



तरुणांनी नेहमी सकारात्मक दृष्टीकोन ठेवला पाहिजे. आजच्या काळात व्याख्यानमाला –जिवंत ठेवणे हे महा कठीण काम करीत असल्याबद्दल अमेय महाजन यांनी वाचनालयाचे कौतुक केले. तसेच त्यांनी स्पर्धा परीक्षा दालन सुरू करावे. असा सल्ला दिला. श्रोत्यांच्या प्रश्नांना त्यांनी समर्पक उत्तरे दिली.

कार्यक्रमाचे प्रास्तविक संस्थेचे कोषाध्यक्ष प्रकाश पाटील यांनी केले. व्याख्यात्यांचा परिचय कार्यकारणी सदस्य काशिनाथ जाधव यांनी करून दिला. कार्यक्रमाचा समारोप औकार्यकारिणी सदस्य रोहिदास पोटे यांनी केला.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी के.गो. लिमये वाचनालयाच्या ग्रंथपाल निकिता शिंदे, सहाय्यक ग्रंथपाल संपदा जोशी, लिपिक हर्षिता तुरकर व सेवक संजय दिवटे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# 'माझी वसुंधरा' अंतर्गत स्वच्छता मोहीम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका आणि के.एल.ई. महाविद्यालय, कळंबोली यांच्या संयुक्त विद्यमाने आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली माझी वसुंधरा कार्यक्रमांतर्गत 'स्वच्छता मोहिमेचे आयोजन शुक्रवारी (दि.२५) करण्यात आले.

पर्यावरण संवर्धन करण्याच्या दृष्टीने माझी वसुंधरा अंतर्गत उपायुक्त स्वरूप खारगे यांच्या सूचनेनूसार हा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमास महापालिकेचे सहाय्यक आयुक्त






श्रीराम पवार, प्राचार्य डॉ.विजय डी. मेंढुलकर ,एनएसएस कार्यक्रम अधिकारी शितल घार्गे, प्रा. विशाल छावरिया, प्रा.विद्या गोसावी, प्रा. दिपिका घाडगे, प्रा. सतिश सोनटक्के उपस्थित होते.

या स्वच्छता मोहिमेंतर्गत के. एल.ई. महाविद्यालय परिसरातील रस्त्यांची सफाई करण्यात आली. स्वच्छतेचे महत्त्व नागरिकांना पटवून देण्यासाठी या स्वच्छता मोहिमेंतर्गत विद्यार्थ्यांनी स्वच्छता रॅली काढण्यात आली. या रॅलीत विद्यार्थ्यांनी विविध घोषणा देत स्वच्छता संदेश देण्यात आला.



**खारघर : हावरे स्प्लेंडर सोसायटीमध्ये पहलगाम दहशतवादी हल्ल्यातील मृतांना श्रद्धांजली वाहण्यात आली. या ठिकाणी शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. सोबतच या अतिरेकी हल्ल्याचा निषेध करण्यात आला. या वेळी भाजपचे जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल यांच्यासह सोसायटीचे पदाधिकारी व रहिवासी उपस्थित होते.**

क्लिक...क्लिक...!



**उरण : उन्हाळ्याच्या दिवसांत ताडगोळ्याचे सेवन शरीरासाठी लाभदायक असल्याने सध्या या फळाला मागणी वाढली आहे. त्यामुळे ताडगोळे विक्रीचा व्यवसाय जोरदार सुरू आहे.**

# वाशीमध्ये चैत्र पालवी विशेषांकाचे प्रकाशन

**नवी मुंबई : बातमीदार**

साहित्य परिषदेतर्फे वाशी योग विद्यानिकेतन येथे चैत्र पालवी विशेषांकाचे प्रकाशन झाले. कार्यक्रमावेळी घराचे स्वप्न साकार करणारी माणसे नॅनो हाऊसिंगचे प्रणेते सुरेश हावरे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. पाहुण्यांनी उपस्थित त्यांना मार्गदर्शन करताना लेखकाने लिहिता झाले पाहिजे लिखाण हे चिरंतन असते व्यक्तीच्या पश्चात देखील व्यक्तीचे लिखाण अजरामर राहत असते. लिखाणाच्या माध्यमातून व्यक्ती अमर होत असते. दुःख आणि करुणा हृदयात असल्याशिवाय लेखनात ती प्रकट होत नाही. या संदर्भात त्यांनी बाबासाहेब पुरंदरे यांचा संदर्भ देऊन स्पष्टीकरण केले.

चैत्रपालवी विशेषांक याचे विशेष म्हणजे या अंकामध्ये महाराष्ट्रातील जवळजवळ सर्व जिल्ह्यातून प्रतिनिधित्व आलेले आपल्याला दिसून येते. नवोदित लेखक कवी साहित्यिक यांना प्रेरणा देण्यासाठी सुरू असलेल्या यज्ञामध्ये या विशेषण काचा माध्यमातून भरीव असा प्रयत्न करण्यात आला.

प्रकाशन समारंभा नंतर कोमल बापट फडके यांच्या सुमधुर वाणीतून राम कथा कीर्तनाचा कार्यक्रम झाला. भक्ती श्रद्धा यांचे अमोल नाते असलेल्या शबरीमाता यांचे चरित्र त्यांनी थोडक्यात



कथन केले. आधुनिक काळामध्ये समाज एकत्र येण्यासाठी कथा कीर्तन प्रवचनांची कशाप्रकारे आवश्यकता आहे याचे प्रतिपादन त्यांनी कीर्तनाच्या माध्यमातून केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ऋतुजा गवस यांनी केले कार्यक्रमाचे प्रास्ताविक संतोष मिसाळ यांनी केले. प्रास्ताविकामध्ये नवी मुंबई साहित्य परिषद करत असलेल्या उपक्रमांची माहिती त्यांनी दिली. चैत्र पालवी विशेष अंकामध्ये झाले ज्या लेखकांचे लेख प्रसिद्ध झाले होते त्यांना अंक आणि भेटवस्तू देण्यात आली. कार्यक्रमाच्या शेवटी डाळ पन्हे देऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

कार्यक्रमासाठी नवी मुंबईतील अनेक साहित्यिक मंडळी उपस्थित राहिले होती. मराठी साहित्य मंडळाचे सुभाष कुलकर्णी कविता डॉट कॉम रवींद्र पाटील सर टीजेएसबी बँकेचे पदाधिकारी विवेकानंद संकुलाचे वावळ, मनीष कुलकर्णी इत्यादी लोकांची उपस्थिती प्रार्थनीय होती.

# कर्जत भात संशोधन केंद्राची व्याप्ती वाढणार

## डॉ. पराग हळदणकर यांचे प्रतिपादन; प्रकल्पाचे भूमिपूजन

**कर्जत : प्रतिनिधी**

कोकण कृषी विद्यापीठाच्या कर्जत येथील भात संशोधन केंद्रात भात पौदास आणि वाण यांची अधिक प्रमाणात निर्मिती व्हावी. यासाठी 'मुख्यमंत्री कृषी संशोधन केंद्र सुरू होत आहे. या संशोधन संरचना प्रकल्पामुळे कर्जत भात संशोधन केंद्राची व्याप्ती वाढणार असून भाताचे वाण शोधण्यात देखील हे केंद्र आघाडीवर येण्यासाठी हा प्रकल्प महत्वाचा आहे, असे उद्गार कोकण कृषी विद्यापीठाचे संशोधन कृषी संचालक डॉ. पराग हळदणकर यांनी काढले.




मुख्यमंत्री कृषी संशोधन केंद्र यांच्या अंतर्गत प्राप्त निधीमधून कर्जत येथील भात संशोधन केंद्रात भात जातींची जलद पैदास आणि वाणांच्या चाचण्यांबाबत संशोधन संरचना उभारणी प्रकल्प उभारला जात आहे. गतिमान पैदास प्रक्षेत्रावरील नियोजित स्थळी श्रीफळ वाढवून सदर प्रकल्पाचे भूमिपूजन करण्यात आले. या वेळी कर्जत येथील प्रादेशिक कृषी संशोधन केंद्राचे सहयोगी संशोधन संचालक भात विशेषज्ञ डॉ. भरत वाघमोडे तसेच विविध विभागाचे शास्त्रज्ञ, अधिकारी व कर्मचारी या वेळी उपस्थित होते.

आंतरराष्ट्रीय भात संशोधन संस्थेचे दक्षिण आशियातील विभागीय केंद्र असलेले वाराणसी, तामिळनाडू मधील कोईमतूर अशा मोजक्या केंद्रात हा प्रकल्प सुरू आहे. महाराष्ट्रात कर्जत येथे रुपये ४४१ लाख रुपयांचा प्रकल्प मंजूर झाल्याने भात संशोधनाला निश्चित नवी दिशा मिळणार आहे.

या वेळी दापोली येथील डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे संशोधन तसेच विस्तार शिक्षण संचालक डॉ. पराग हळदणकर यांनी देशातील मोजक्याच जलद पैदास संशोधन केंद्रामध्ये कर्जतचा समावेश आहे. ही गौरवाची बाब असून या तंत्रज्ञानामुळे भात जाती संशोधनात लागणारा कालावधी कमी होऊन जनतेच्या गरजेनुरूप वाण संशोधन करण्यास मदत होणार आहे. त्याचवेळी भात पैदास आणि वाण निर्मिती मध्ये चालना मिळून विद्यापीठाच्या नाव लौकिकात निश्चित भर पडेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तर सहयोगी संशोधक डॉ. वाघमोडे यांच्या नेतृत्वात संशोधन केंद्राचा झपाट्याने कायापालट होत असल्याचे गौरवोद्गारही त्यांनी काढले.

भात हे उसापेक्षा कमी पाणी लागणारे पीक असून त्यामुळे जमिनीत पाणी टिकून राहते. परिणामतः कोकणात शेतकऱ्यांच्या आत्महत्या नाहीत, याकडे त्यांनी लक्ष वेधले. नियोजित वेळेपूर्वी हा प्रकल्प पूर्ण व्हायला हवा. अशी अपेक्षा व्यक्त केली. दापोली कोकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ संजय भावे, कुलसचिव डॉ.प्रदीप हळदवणेकर, नियंत्रक जोईस, विद्यापीठ अभियंता पूजा इंगवले (देसाई) यांनी या प्रकल्पाला शुभेच्छा दिल्या आहेत.

# मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग पर्यटकांनी जाम



**खोपोली : प्रतिनिधी**

शनिवार आणि रविवार मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर वाहनांची संख्या वाढते. विशेषतः मुंबईहून पुण्याकडे जाणारे पर्यटक संख्या जास्त असल्याने बोरघटात अमृतांजन नजीक वाहतूक कोंडी नेहमीच होते.

वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी बोरघाट पोलीस मदत केंद्राचे पोलीस अक्षरशः तीन लेनवर उभे राहून वाहतूक सुरळीत करण्याचा प्रयत्न करतात. अवजड वाहने लेनची शिस्त पाळत नसल्याने वाहतूक कोंडीत अधिक भर पडते.

सकाळी आठ ते टप्प्याटप्प्यावर अमृतांजन नजीक लेनवर मधोमध पोलीस उभे राहून वाहतूक मंद गतीने का होईना सुरू ठेवण्यासाठी शनिवारी प्रयत्न करत होते.

# रोहा ब्राह्मण मंडळातर्फे वासंतिक रसपान

**रोहे : प्रतिनिधी**

रोह्यातील ब्राह्मण समाजाची ज्ञातीसंस्था असलेल्या ब्राह्मण मंडळ रोहाच्या महिला कार्यकारिणी तर्फे शुक्रवारी (दि.२५) चैत्र मासानिमित्त महिला भगिनींसाठी वासंतिक रसपान व हळदीकुंकू समारंभ उत्साहात झाला. या उपक्रमाला ब्राह्मण समाजातील भगिनींचा उत्स्फुर्त प्रतिसाद लाभला.



कार्यक्रमासाठी ब्राह्मण मंडळ रोहा मुख्य कार्यकारिणी सदस्या स्मृती जोशी, स्वाती पेंडसे, महिला कार्यकारिणी सदस्या मिरा गांगल, मृणाल पेंडसे, प्राजक्ता पाटणकर,विद्या कमलाकर, अनन्या जोशी, राजश्री आठवले, वैदीही अमित आठवले, माणिक गोठणकर, आरती धारप, मानसी साठे आदींनी मेहेनत घेतली.

# अंजुमन कॉलेजमध्ये पदवी प्रदान समारंभ व वार्षिक बक्षीस वितरण

**मुरूड : प्रतिनिधी**

अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स, मुरूड-जंजिरा येथे २६ एप्रिल २०२५ रोजी पदवीप्रदान समारंभ व वार्षिक बक्षीस वितरण समारंभ उत्साहात महाविद्यालयाच्या प्रांगणात पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अंजुमन इस्लाम जंजिरा हलका मजलिस मुरूडचे अध्यक्ष तसेच अंजुमन इस्लाम जंजिराचे उपाध्यक्ष अझीम हमिद खानजादा हे होते.



मुख्य अतिथी म्हणून कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ, साताऱ्याचे कुलगुरू डॉ. ज्ञानदेव म्हस्के व युनिव्हर्सल एज्युकेशन ण्ड वेलफेअर फाउंडेशनचे अध्यक्ष माननीय दिलावर महाडकर उपस्थित होते. कार्यक्रमास विशेष अतिथी म्हणून मुरुड पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विजयकुमार देशमुख, तसेच डी. जी. महाविद्यालय साताराचे प्राचार्य डॉ. विठ्ठल सावंत, वीर वाजेकर महाविद्यलय उरण चे प्राध्यपक डॉ. गुरमीत वाधवा, फुरकान कादिरी यांची उपस्थिती लाभली.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे अध्यक्ष्य जैनुद्दीन कादरी आणि प्रभारी प्राचार्य डॉ. साजिद शेख यांनी केले.

या कार्यक्रमादरम्यान ४० गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांचे मनोबल वाढविण्यात आले. एकूण ७०विद्यार्थ्यांना पदवीप्रदान करण्यात आले तसेच १५० हून अधिक विद्यार्थ्यांना सांस्कृतिक व क्रीडा विभागाचे प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. उपस्थित सर्व मान्यवरांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या आणि उज्वल भविष्यासाठी प्रेरणा दिली.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अंजुमन इस्लाम जंजिराचे सचिव हिफझुर्रहमान शौकत अली नझिरी, खजिनदार अल्ताफहुसेन मलिक, सहसचिव ए.रहिम काबले तसेच महाविद्यालयाचे अध्यक्ष जैनुद्दीन कादरी आणि प्रभारी प्राचार्य डॉ. साजिद शेख यांचे मार्गदर्शन लाभले. महाविद्यालयाच्या विकास समितीचे सदस्य तौसिफ फत्ते, इस्माईल शेख आणि इमरान मलिक यांचेही कार्यक्रम यशस्वी करण्यात मोलाचे योगदान राहिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहाय्यक प्राध्यापक प्रा. निदा गोर्मे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनामध्ये महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचा मोलाचा सहभाग राहिला.

# 'यशवंती हायकर्स', पोलीस वीरांगनांचे कौतुक

**चौक : प्रतिनिधी**

सामर्थ्य शब्दांचे या उपक्रमांतर्गत ज्येष्ठ पत्रकार राजीव मुळेकर यांनी यशवंती हायकर्स व रायगड पोलीस दलातील विरांगनांचा कौतुक सोहळा पंचायत समिती, खालापूर येथे आयोजित केला होता.

या वेळी यशवंती हायकर्स या गिर्यारोहण संस्थेच्या माध्यमातून रायगड पोलीस दलातील महिला व पुरुष अधिकारी व कर्मचारी यांना दिलेले रॅपलिंग चे प्रशिक्षण हे प्रेरणादायी असून यासारखे साहसी प्रशिक्षण महाराष्ट्रातील सर्व पोलिसांना मिळणे गरजेचे आहे त्यातून शारीरिक स्वस्थतेबरोबरच सर्व परिस्थितीत आम्ही साहसाने सामना करू शकतो ही मनोभूमिका देखील तयार होते, असे उद्गार राष्ट्रीय तपास संस्थेचे पूर्व विशेष पोलीस महासंचालक अतुलचंद्र कुलकर्णी यांनी काढले.

व्यासपीठावर राज्य गुप्तचर नियंत्रण नाशिक विभागाच्या उपायुक्त गीता चव्हाण, रायगडचे अतिरिक्त पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे, विभागीय पोलीस अधीक्षक विक्रम कदम, ज्येष्ठ पत्रकार राजीव मुळेकर इ. मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराजांच्या अर्ध पुतळ्याला पुष्पहार अर्पण केल्यानंतर मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर राजीव मुळेकर यांनी तयार केलेल्या रॅपलिंग प्रशिक्षणाच्या ' कठीण वज्रास भेंदू ऐसे ' या सचित्र पुस्तिकेचे प्रकाशन अतुलचंद्र कुलकर्णी यांच्या हस्ते झाले. राजीव मुळेकर यांनी आपल्या प्रास्ताविकामध्ये हा कार्यक्रम आयोजित करण्यामागची संकल्पना उपस्थितांसमोर कथन केली.

यशवंती हायकर्स चे माजी अध्यक्ष महेंद्र भंडारे यांनी संस्थेचा इतिहास उपस्थितांसमोर मांडला. रायगड पोलीस उप अधीक्षक अभिजित शिवथरे यांनी रायगडमधील महिला पोलिसांनी रॅपलिंगचे प्रशिक्षण घेतल्याबद्दल त्यांचे विशेष कौतुक केले.

अतुलचंद्र कुलकर्णी यांनी उपस्थित असलेल्या एन.सी. सी.च्या मुलींनी एनडीए मध्ये प्रवेश घ्यावा तसेच भविष्यामध्ये सैन्यदला मध्ये दाखल होण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याचे आवाहन केले. सूत्रसंचालन प्रा. डॉक्टर भाऊसाहेब नन्नवरे यांनी केले. तर नितीन भावे यांनी आभार मानले.



# क्षयरोग निर्मूलनासाठी कार्य करणाऱ्या ग्रामपंचायतींना सन्मान

**कर्जत : प्रतिनिधी**

प्रधानमंत्री क्षयरोग मुक्त ग्रामपंचायत अभियान अंतर्गत तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयाच्या माध्यमातून पंचायत समिती कर्जत येथे भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या वेळी क्षयरोग निर्मूलनासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या आठरा ग्रामपंचायतींना सन्मान करण्यात आला.



या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गटविकास अधिकारी सुशांत पाटील उपस्थित होते. प्रास्ताविकात तालुका आरोग्य अधिकारी डॉ. नितीन गुरव प्रास्ताविक केले. क्षयरोग निर्मूलनासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या आठरा ग्रामपंचायतींना ब्रॉन्झ मेडल (प्रमाणपत्र व मानचिन्ह) आणि मागील दोन वर्ष सतत उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल सहा ग्रामपंचायतींना सिल्व्हर मेडल (प्रमाणपत्र व मानचिन्ह) देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.

रविंद्र माने यांनी सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले व नितीन पाटील यांनी क्षयरोग ची विस्तारित माहिती दिली. त्या नंतर कार्यक्रमात प्रमुख मान्यवरांनी उपस्थित सर्व सरपंच, वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्य सहाय्यक, आशा स्वयंसेविका, गटप्रवर्तक, तालुका समूह संघटक, आरोग्य सेवक आणि सेविका यांना मार्गदर्शन केले.

या वेळी सरपंच आणि ग्रामविकास अधिकारी यांनी ग्रामसभांमध्ये आरोग्य शिक्षणावर भर देत आशा कार्यकर्त्यांना क्षयरोग निर्मूलनात अधिक सक्रिय करण्याचे आवाहन केले. त्यामुळे सर्व ग्रामपंचायती क्षयरोगमुक्त होण्यासाठी पुढाकार घेतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयातील कर्मचारी गजेंद्र महाजन व उल्हास जाधव यांनी केले. तालुका आरोग्य अधिकारी डॉ. नितीन गुरव यांच्या आभार मानले.

# रायगड मेडिकल असोसिएशनतर्फे दहशतवादी हल्ल्याचा निषेध

**कर्जत : रामप्रहर वृत्त**

काश्मीरमधील पहलगाम येथे निष्पाप पर्यटकांवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा रायगड मेडिकल असोसिएशनकडून निषेध करण्यात आला. कर्जतमध्ये आयोजित शोकसभा आणि श्रद्धांजली कार्यक्रमात हुतात्मांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.



या कार्यक्रमात अनेक मान्यवर वैद्यकीय अधिकारी उपस्थित होते. डॉ. प्रशांत गांगल (सचिव), डॉ. कुमार ओसवाल (खजिनदार), डॉ. दिलीप सावळे (संपादक), डॉ. निलेश म्हात्रे,डॉ. साजिद अधिकारी, डॉ. आशिष कर्वे (केएमए अध्यक्ष), डॉ. प्रेमचंद जैन (आयएमए कर्जत अध्यक्ष), डॉ. मिलिंद सोनवळे(निमा कर्जत अध्यक्ष), डॉ गंगोलिया, डॉ लाड, डॉ शितुत, डॉ. शर्वाणी कुलकर्णी, डॉ. अदिती कर्वे, डॉ सुप्रिया म्हामूनकर, डॉ गजानन चव्हाण , डॉ नितीन भोपतराव, डॉ. गणेश साळुंखे, डॉ. महेश शिरसाट , डॉ. संजीव पाटील, डॉ. विकास गोमरे, डॉ श्रीपाल जैन, डॉ गीतांजली राव, डॉ दिगंबर पवार यांचा समावेश होता.

# साळाव जिंदल विद्यामंदिरात पुस्तक दिन

**मुरूड : प्रतिनिधी**

जिंदल विद्या मंदिर, साळाव येथे नुकताच जागतिक पुस्तक दिनानिमित्त विविध शैक्षणिक व सर्जनशील उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. शाळेच्या ग्रंथालय विभागातर्फे राबवले गेलेले हे उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण करणारे आणि पुस्तकांविषयी आत्मीयता वाढवणारे ठरले.



प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांसाठी शब्द शोध हा उपक्रम राबवण्यात आला. या उपक्रमात विद्यार्थ्यांना ग्रंथालयाशी संबंधित शब्द शोधून लिहायचे होते. यामुळे त्यांचे शब्दज्ञान वाढीस लागले व भाषिक कौशल्य विकसित झाले.

माध्यमिक विभागातील विद्यार्थ्यांना 'भिलार-पुस्तकांचे गाव' या आगळ्या-वेगळ्या संकल्पनेची माहिती व्हिडीओच्या माध्यमातून देण्यात आली. यानंतर वाचनावर आधारित प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आली, ज्यात विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला.

या दिवशी ग्रंथालयात नुकतीच खरेदी केलेल्या नवीन पुस्तकांची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. ही पुस्तके हाताळताना विद्यार्थ्यांनी आनंद व्यक्त केला. Hooked by Book या उपक्रमांतर्गत शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी आपले आवडते पुस्तक खास तयार करण्यात आलेल्या बोर्डवर नोंदवले. काही विद्यार्थ्यांनी आपल्या आवडत्या पुस्तकांचे सारांशही लिहून सादर केले.

याव्यतिरिक्त, जुनी पुस्तके वापरून तयार करण्यात आलेले पुस्तकांचे घर सर्वांचे विशेष आकर्षण ठरले. कार्यक्रमाच्या शेवटी प्राचार्य मुकेश ठाकूर यांनी विद्यार्थ्यांना वाचनाची सवय लावण्याचे महत्त्व अधोरेखित करत, पुस्तक हे आयुष्याचे खरे मार्गदर्शक आहे, असा प्रेरणादायी संदेश दिला. उपप्राचार्य मंगेश बामनोटे यांनी उपक्रमांची स्तुत्य दखल घेत आयोजकांचे कौतुक केले.

हा कार्यक्रम ग्रंथपाल वैभवी थत्ते यांच्या पुढाकाराने, तसेच नयन पोल, अर्चना तोडणकर, संदीप तिवारी, दत्तात्रय खवले आणि अवधूत आठवले यांच्या सहकार्याने यशस्वीरीत्या पार पडला.

# अधिकारीवर्ग रोह्यातील शेतकऱ्यांच्या थेट बांधावर

**धाटाव : प्रतिनिधी**

जिल्हा परिषद सेस फंड योजनेंतर्गत रोहा तालुक्यात विविध कृषी योजनेमधून २५२ शेतकऱ्यांना २८ लाख रुपये अनुदान वितरीत करणेत आले आहे. त्याबाबत करणेत आलेल्या कामांची पाहणी करण्याकरिता रायगड जिल्हा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजीत बडे साहेब, कृषी विकास अधिकारी पवनकुमार नजन साहेब, जिल्हा कृषी अधिकारी यादव साहेब व सूर्यवंशी मॅडम यांनी भेट दिली.



जिल्हा परिषद कृषी विभागामार्फत सन २०२४-२०२५ या वर्षामध्ये राबविणेत आलेल्या योजनेतील लाभार्थ्यांच्या प्रत्यक्ष शेतावर जाऊन पाहणी केली व शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. पिगोंडे येथील शेतकरी अंकुश तडकर यांना तार कुंपण या योजनेचा लाभ देणेत आला होता तसेच निडी येथील शेतकरी प्रभाकर कारभारी यांना सौर दीप संच लाभ देणेत आला आहे.

पुगाव येथील अनुसूचीत जमातीतील लाभार्थी यांना बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेतून सिंचन विहीर लाभ देणेत आला आहे. या सर्व लाभार्थ्यांच्या शेतावर भेट देऊन पाहणी करणेत आली. बडेसाहेब यांनी शेतकऱ्यांना आगामी वर्षात कोणत्या नवीन योजना घ्याव्यात याबाबतदेखील शेतकऱ्यांसोबत चर्चा केली. या वेळी पंचायत समिती येथील कृषी अधिकारी रणजीत लवटे उपस्थित होते.

तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांच्या बांधावर भेट जिल्हा कृषी मुख्य अतिरिक्त कार्यकारी अधिकारी सत्यजित बडे यांनी शेतकऱ्यांच्या अडचणी जाणून घेत त्यांच्याशी संवाद साधला. केंद्र व राज्य शासनाच्या नवीन योजनेची इंतबुत माहिती त्यांनी शेतकऱ्यांना दिली.

तंत्रज्ञानाचा वापर कशा पद्धतीने करणे, त्याचे फायदे कोणते तसेच फळांची लागवड कशा पद्धतीने केली पाहिजे अशा प्रकारचे विविध माहिती देण्यात आली. तर स्वामी विवेकानंद रिसर्च ट्रेनिंग इन्स्टिट्युट या संस्थेत जाऊन कृषी अधिकारी यांनी सेंद्रिय खत प्रोजेक्ट ला प्रत्यक्ष भेट दिली. तालुक्यातील असंख्य शेतकऱ्यांना स्वामी रिसर्च संस्थेने केलेल्या मदतीची माहिती संस्थेचे अधिकारी रुळेकर यांनी दिली.

# कोलकाता-पंजाब सामना पावसामुळे रद्द



**कोलकाता : वृत्तसंस्था**

कोलकाताच्या ईडन गार्डन्सवर खेळवला गेलेला पंजाब किंग्स वि. कोलकाता नाईट रायडर्स सामना पावसामुळे रद्द झाला. यासह दोन्ही संघांना प्रत्येकी एक गुण देण्यात आला आहे. पंजाबने दिलेल्या २०२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना कोलकाताने एक षटक फलंदाजी केली आणि त्यानंतर वादळ, पाऊस आला. काही वेळाने सामना रद्द करण्यात आला.

कोलकातामध्ये दुसऱ्या डावातील दुसरे षटक सुरू होण्यापूर्वी अचानक वादळी पावसाला सुरुवात झाली. वादळ इतके जोरदार होते की ग्राउंड स्टाफला कव्हर मैदानावर व्यवस्थित ठेवताही आले नाहीत. यादरम्यान काही कव्हरही फाटले. सामना थांबवण्यात आला तेव्हा सुनील नारायण चार धावांसह आणि रहमानउल्लाह गुरबाज एका धावेसह खेळत होते.

कोलकातामधील सामना अनिर्णीत राहिल्याने पंजाब आणि कोलकाता यांना प्रत्येकी एक गुण मिळाला. यासह श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखालील संघाचे नऊ सामन्यांत ११ गुण झाले आहेत. त्यांचा नेट रन रेट ०.१७७ होता. मुंबई इंडियन्सला मागे टाकत त्यांनी चौथे स्थान गाठले.

केकेआरलाही एक गुण मिळाला. यामुळे त्यांचे नऊ सामन्यांमधील एकूण सात गुण झाले आहेत. संघ पूर्वीप्रमाणेच सातव्या स्थानावर आहे. सामना रद्द झाल्यामुळे कोलकाता संघाचे नुकसान झाले आहे. आता प्लेऑफ गाठण्यासाठी त्यांना सर्व सामने जिंकावे लागतील, तर पंजाबचे फारसे नुकसान झाले नाही. आयपीएल २०२५मध्ये पहिल्यांदाच पावसामुळे सामना रद्द झाला. प्रथम फलंदाजी करताना पंजाबने २०१ धावा केल्या होत्या. कोलकाताच्या डावातील एका षटकानंतर पावसाला सुरुवात झाली. बराच वेळ पाऊस न थांबवल्याने अखेर सामना रद्द करण्यात आला.

# राज्यस्तरीय शूटिंग बॉल स्पर्धेत मालेगाव संघ विजेता



**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील बहिरीदेव स्पोर्ट् क्लब बहिरीचा पाडाच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय शूटिंग बॉल स्पर्धेत इस स्टॉक मालेगाव संघाने विजेतेपद पटकाविले.

द्वितीय क्रमांक अमिर संघ माळशिरस सोलापूर, तृतीय दूध डेअरी संघ पुणे, चतुर्थ क्रमांक टेमघर महाड संघाने प्राप्त केला. उत्कृष्ट खेळाडू इस्तियाक (मालेगाव), उत्कृष्ट शूटर अमीर काझी (सोलापूर) व उत्कृष्ट नेटमन विजय (पुणे) ठरला. चार विजेत्या संघांना तसेच उल्लेखनीय कामगिरी बजावलेल्या खेळाडूंना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. या वेळी पदाधिकारी, खेळाडू, ग्रामस्थ उपस्थित होते.

# प्रियांश-प्रभसिमरनने मोडला गेल-राहुलचा विक्रम

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

कोलकाताच्या ईडन गार्डन्सच्या मैदानात पंजाब किंग्जची सलामी जोडी प्रियांश आर्य आणि प्रभसिमरन सिंग यांनी शतकी भागीदारीसह संघाला दमदार सुरुवात करून दिली. एवढेच नव्हे; तर या जोडीने ख्रिस गेल आणि केएल राहुल यांनी केलेला विक्रम मागे टाकल्याचे पहायला मिळाले.

कोलकाताविरुद्ध पंजाबकडून खेळताना सलामीला सर्वाधिक धावसंख्येचा रेकॉर्ड याआधी ख्रिस गेल आणि केएल राहुलच्या नावे होता. आता हा विक्रम प्रियांश आर्य ६९ (३५) आणि प्रभसिमरन सिंगच्या ८३ (४९) नावे झाला आहे.



गेल आणि राहुल या जोडीने २०१८च्या हंगामात पंजाब संघाकडून खेळताना पहिल्या विकेटसाठी ११६



धावांची भागीदारी रचली होती. २०२५च्या हंगामातील ४४व्या सामन्यात प्रियांश अन् प्रभसिमरन जोडीने १२० धावांची भागीदारी रचत हा विक्रम मोडीत काढला. कोलकाताविरुद्ध कोणत्याही विकेटची ही दुसऱ्या क्रमांकाची भागीदारी ठरली.

वृद्धिमान साहा आणि मनन ओहरा या जोडीनं कोलकाताविरुद्धच्या सामन्यात पंजाबकडून सर्वोच्च धावसंख्या केल्याचा रेकॉर्ड आहे. या दोघांनी २०१४च्या हंगामात बंगळुरुच्या मैदानात रंगलेल्या फायनलमध्ये तिसऱ्या विकेटसाठी १२९ धावांची भागीदारी रचली होती. त्यानंतर या यादीत प्रियांश आर्य आणि प्रभसिमरन जोडी १२० धावांच्या भागीदारीसह दुसऱ्या क्रमांकावर आहे.

# आयपीएलमध्ये प्रभसिमरन सिंगने रचला इतिहास

## एक हजार धावा करणारा पहिला अनकॅप्ड खेळाडू



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

कोलकाता नाईट रायडर्सविरुद्ध शनिवारी झालेल्या सामन्यात पंजाब किंग्जचा सलामीवीर प्रभसिमरन सिंगने अर्धशतकी खेळी केली. या कामगिरीसह त्याने खास विक्रमाला गवसणी घातली.

केकेआरविरुद्धच्या सामन्यात प्रभसिमरनने अवघ्या ४९ चेंडूत सहा षटकारांच्या मदतीने ८३ धावा केल्या. या कामगिरीसह तो आयपीएलमध्ये एक हजार धावांचा टप्पा गाठणारा पहिला अनकॅप्ड खेळाडू ठरला. आयपीएलमध्ये आतापर्यंत कोणत्याही अनकॅप्ड खेळाडूला अशी कामगिरी करता आली नाही. प्रभसिमरन २०१९पासून आयपीएलमध्ये खेळत आहे. पहिल्या हंगामात त्याची पंजाबसाठी निवड झाली. आतापर्यंत प्रभसिमरनने ४३ सामन्यांमध्ये एक हजार ४८ धावा केल्या आहेत, ज्यामध्ये एक शतक आणि पाच अर्धशतकांचा समावेश आहे.

















**पनवेल : येथील महापालिकेच्या माध्यमातून साकारलेल्या दिलीप वेंगसरकर संचलित आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रिकेट प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन मंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते झाले.**

# रसेलने अश्विनला टाकले मागे

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयपीएलच्या १८व्या हंगामातील ४४वा सामना पावसामुळे अनिर्णित राहिला. परिणामी घरच्या मैदानात खेळणाऱ्या कोलकाता नाईट रायडर्सच्या संघासह पंजाब किंग्ज संघाला प्रत्येकी एक गुण देण्यात आला. या सामन्यात कॅरेबियन अष्टपैलू खेळाडू आंद्रे रसेल याने गोलंदाजी वेळी एक पराक्रम आपल्या नावे केला आहे.

पंजाब किंग्जच्या संघाने पहिल्यांदा फलंदाजी करताना निर्धारित २० षटकात चार विकेट्सच्या मोबदल्यात २०१ धावा केल्या होत्या. या सामन्यात गोलंदाजी वेळी कोलकाताच्या गोलंदाजांच्या पदरी निराशा आली. त्यातही मोक्याच्या क्षणी विकेट मिळवून देण्यात हातखंडा असलेल्या आंद्रे रसेलने मोठा डाव साधला.

यंदाच्या हंगामात रसेलने बॅटिंगमध्ये अजून मसल पॉवर दाखवलेली नाही, पण गोलंदाजी दिल्यावर त्याने विकेट घेत कर्णधाराचा विश्वास सार्थ ठरवल्याचे पहायला मिळाले आहे. पंजाब किंग्जविरुद्धच्या सामन्यात प्रमुख गोलंदाजांचे खांदे पडल्यावरही तो उपयुक्त ठरला. अजिंक्य रहाणेने हाती चेंडू सोपवल्यावर आपल्या पहिल्याच षटकातील पाचव्या चेंडूवर त्याने विकेट घेतली. या विकेटसह त्याने रविचंद्रन अश्विनचा विक्रम मोडीत काढला आहे. आयपीएलमध्ये पहिल्याच षटकात सर्वाधिक विकेट घेणाऱ्या गोलंदाजांच्या यादीत तो दुसऱ्या स्थानावर पोहचला आहे.

आयपीएलमध्ये पहिल्या षटकात सर्वाधिक ४८ विकेट्स घेण्याचा विक्रम हा माजी फिरकीपटू पियुष चावलाच्या नावे आहे. त्याच्या पाठोपाठ आता आंद्रे रसेलचा नंबर लागतो. आयपीएलमध्ये रसेलने पहिल्या षटकात ४६ विकेट्स घेतल्या आहेत. या यादीत अश्विन ४५ विकेट्ससह तिसऱ्या क्रमांकावर आहे.

कोलकाता नाईट रायडर्सच्या संघातील प्रमुख खेळाडू असलेल्या रसेलने आयपीएलमधील आपल्या आतापर्यंतच्या करिअरमध्ये १३६ सामन्यात २७.९०च्या सरासरीसह २५३९ धावा केल्या आहेत. याशिवाय त्याच्या खात्यात १२२ विकेट्सही जमा आहेत. १५ धावा खर्च करून पाच विकेट्स ही गोलंदाजीतील त्याची सर्वोत्तम कामगिरी राहिली आहे.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com